श्रीकृष्णलीलामृत
(भाग-१)

# श्रीकृष्णलीलामृत (भाग-१)

श्रीश्रीमद्भक्तिवेदान्त नारायण गोस्वामी महाराजजींच्या मुखनिःसृत अमृतमय वाणीने संकलित

आपल्या परम कल्याणासाठी नियमित जप करा:
।। महामंत्र ।।
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे।
हरे राम हरे राम राम रा हरे हरे।।

।। श्री श्री गुरु-गौरांगौ-जयतः।।
श्रीकृष्णलीलामृत (भाग १)

श्रीगौडीय वेदान्त समिती तसेच तदन्तर्गत भारतव्यापी श्रीगौडीय मठाचे प्रतिष्ठाता श्रीकृष्णचैतन्याम्नाय दशमाधस्तनवर श्रीगौडीयाचार्य केसरी नित्यलीला प्रविष्ट ॐ विष्णुपाद अष्टोत्तरशत

श्रीश्रीमद्भक्तिप्रज्ञान केशव गोस्वामी महाराजजींच्या अनुग्रहाने
त्रिदंण्डिस्वामी
श्रीश्रीमद्भक्तिवेदान्त नारायण गोस्वामी महाराजजींच्या श्रीमुखानिःसृत
अमृतमयवाणीने संकलित
प्रकाशक

श्री गोकुलचंद्रदास
गौडीय वेदान्त पब्लिकेशन
प्रथम संस्करण -
राधाष्टमी
१ सप्टेंबर, सन २००६
मुद्रक
राइज एडवर्टाइजिन्स प्रा. लि.
ओखला नवी दिल्ली
प्राप्ती स्थान

## प्रकाशकीय वक्तव्य

श्रीकृष्णलीलामृत ग्रंथाच्या पहिल्या भागाचे प्रकाशन माझ्या प्रिय वाचकांसमोर सादर करताना मला अपार आनंद होत आहे. श्रील गुरुदेव ॐ अष्टात्तरशत श्रीश्रीभक्तिवेदान्त गोस्वामी महाराजांच्या प्रवचनावर आधारित छोट्या आकाराच्या ग्रंथाच्या मालिकेत हा दुसरा ग्रंथ आहे. प्रथम ग्रंथ “श्रीमद्भगवत् गीता सार” वाचकांना खूप आवडला आणि थोड्या दिवसातच या ग्रंथाचे दोन संस्करण (आवृत्ती) छापल्या गेल्या.

श्रीकृष्णलीला ग्रंथाच्या प्रथम भागात श्रीकृष्ण जन्मलीला आणि पूतना उद्धारलीलाचे सविस्तर वर्णन केले आहे. श्रील गुरुदेवांनी विभिन्न शास्त्रग्रंथातून ह्या लिलांची माहिती दिली आहे. ही माहिती कोणत्या एका ग्रंथात मिळणे फार दुर्लभ आहे.

भगवान श्रीकृष्णाच्या मधुरातिमधूर लीलांचे वाचन करुन रसिक भक्तांच्या हृदयात ह्या लीलांमध्ये प्रवेश करण्याची लालसा जागृत व्हावी अशी माझी श्रीश्री गुरु-गौरांग-गांधर्विका गिरिधारीजींच्या चरणी प्रार्थना आहे.

ग्रंथात छपाईत काही चुका निघाल्यास सज्जन वाचकवृंद दिलदारपणे क्षमा करतील आणि संशोधन करुन ग्रंथाचे सार ग्रहण करतील.

श्रीश्रीगुरुकृपालेशपार्थी

दीन-हीन गोकुलचंद्र दास

मराठी संस्करण (अनुवाद)
श्री शुकदेव खंडेराव बनकर

**प्रस्तावना**

साधारणतः जगात ही गोष्ट प्रचलित आहे की परमेश्वर दुष्टांचा नाश आणि साधुंच्या (भक्तांच्या) रक्षणासाठी जगात अवतीर्ण होतो. निःसंदेह परमेश्वर ह्या जगात अवतरित होवून हे कार्य अवश्य करतात, परंतु परमेश्वराचे आणखिन एक दुसरे कारण आहे की, आपले मूळ नररुप प्रगट करुन अद्भूत लीलांचा प्रकाश करणे.

श्रील कृष्णदास कविराज गोस्वामींनी श्रीमद्भागवताच्या (१०/३३/३६) श्लोकातून नमूद करुन हा विषय स्पष्ट करित आहेत.

अनुग्रहाय भक्तांनां मानुषं देहमाश्रितः।
भजेत तादृशीः क्रीडायाः श्रुत्वा तत्परोभवेत्।।

अर्थात भगवान श्रीकृष्ण भक्त आणि सर्व जीवांवर कृपा करण्यासाठीच आपल्या नररुपात प्रगट होवून अशी लीला करतात. ज्या ऐकून जीव भगवत् परायण होईल.

इथे श्रील कृष्णदास कविराज गोस्वामींनी वरील मूळ श्लोकात उल्लिखीत 'भवेत' क्रियांना विधिलिंड़ सांगून त्याचा असा अर्थ लांगितला आहे की, परमेश्वरांच्या अशा लिलांचे श्रवण करणे जीवाचे अनिवार्य कर्तव्य आहे.

भवेत् क्रिया विधिलिंड़ सेई इहा कय।
कर्तव्य अवश्य एइ, अन्यथा प्रत्यवाय।।
(चै.च.आ. ४/३५)

अर्थात भगवान श्रीकृष्ण नराकार रुपात स्वयं प्रगट होवून भक्तांवर अनुग्रह करण्यासाठीच विविध प्रकारच्या क्रिडा (लीला) करतात. म्हणून श्रीकृष्ण आप्तकाम असूनही भक्तांप्रति जी कृपा करतात ती उपयुक्तच आहे. विशेषतः

विशुद्धसत्वाचा हाच स्वभाव आहे. भगवान भक्तांच्या भजनाला अनुरुप फल प्रदान करण्यासाठी सदैव तत्पर असतात.
रहूगण राजाच्या प्रति श्रीजडभरतचा किंवा माझ्या (शुकदेव) प्रति परमेश्वराचा अनुग्रह (प्रेम) हाच याचा दृष्टांत आहे. इथे भक्तांवर अनुग्रह (कृपा) करण्यासाठी जे सांगितले यात ‘भक्त’ शब्दाने व्रजदेवि व्रजवासी तसेच भूतः भविष्य आणि वर्तमान- ह्या तिन्ही काळातील अनन्य सर्व वैष्णवांवर कृपा केली आहे. पूर्वरागादीद्वारा व्रजदेविंवर जन्मादि विविध लीलांद्वारा निखिल व्रजवासि तसेच पूर्वोक्त लीलाकथेद्वारा भूत भविष्य आणि वर्तमान काळातील भक्तांप्रति देखिल अनुग्रह करण्यासाठी स्वतः भगवान श्रीकृष्ण तशा क्रिडा प्रीतिपूर्वक संपादन करित आहेत. अर्थात भक्तांसाठी श्रीकृष्ण अशा लीलांचा विस्तार करतात की ह्या लीलांवरुन साधारण लीलांचे श्रवण करुन भक्ताव्यतिरिक्त अनन्य साधारण व्यक्ति देखील श्रीभगवत परायण होतात. याचा दुसरा अर्थ असा होऊ शकतो की ज्या जीवांनी मनुष्य देहाचा आश्रय घेतला आहे, ते साधारण जीव ह्या लीलाकथा ऐकून (श्रवण करुन) भगवत परायण होतील कारण मर्त्यलोकात (पृथ्वीवर) यांचे भजन उन्नत होईल. यासाठी मर्त्यलोकात राहणाऱ्या जीव मनुष्यांसाठी परमेश्वराच्या ह्या लीलाकथांचे श्रवण अनायास संपन्न होईल. ह्या श्लोकात “भक्तांना” हा शब्द आहे. काही श्लोकांमध्ये “भूताना” हा शब्द देखिल आला आहे. यावरुन त्याचा अर्थ असा होईल. परमेश्वर भक्तांसाठीच अवतिर्ण होतात. परंतु आपल्या अवताराचे मूळ कारण भक्तांचे संबंध-मुक्त, मुमुक्षु, विषयी आणि निखिल प्राणीमात्रांवर दया करण्यासाठी स्वयंरुप नरदेह प्रकट करतात. याद्वारा श्रीपरमेश्वराची दयाच या प्रागट्याचे कारण दाखवित आहे. तसेच भक्तांच्या कृपावरुन अनन्य जीवांप्रति त्यांचा अनुग्रह समजायला हवा.
श्रीधर स्वामींनी देखिल आपल्या भावार्थदीपिका ग्रंथात असे नमूद केले की भक्तच काय परंतु परमेश्वरांच्या लीलाकथांचे श्रवण करुन बहिर्मुख व्यक्तीची (अज्ञानी) बहिर्मुख वृत्ति (अज्ञान) दूर होते तसेच ते शुद्ध भक्त होतात.

श्रील विश्वनाथ चक्रवर्ति ठाकुरांनी या श्लोकाच्या सारार्थदर्शिनी टीकेत असे नमूद केले की, - भगवान भक्तांप्रति अनुग्रह (दया) प्रकाश करण्यासाठीच तशा विविध प्रकारच्या लीला प्रकाशित करतात. जे लोक या लीला कथांचे श्रवण करतात, ते मनुष्य देहधारी जीव भगवतपरायण  अर्थात लीलाकथांच्या श्रवणाने ते श्रद्धावान होतात. या लीला कथांच्या श्रवणाचा महिमा अधिक काय सांगू?

भगवानांची अनन्य क्रीडादेखिल अत्यंत विलक्षण मधूर-रसमयी या रासक्रिडेची मणि-मंत्र आणि महौषधी (गुणवान) प्रमाणे एक आश्चर्यजनक अतर्क्य शक्ति आहे. ज्याद्वारे मनुष्यदेहधारी सर्व जीव यांचे श्रवण करुन भगवतपरायण होतील. म्हणून सर्व प्रकारचे भक्त या लीलाकथांचे श्रवण करुन परमानंद प्राप्त करुन कृतार्थ होतील यात तिळमात्र शंका नाही.

ग्रंथाच्या निर्मितीसाठी प्रवचनांच्या संग्रहकार्यात बेटी जानकी दासी, प्रवचनाच्या संग्रहासाठी कॉम्प्युटरवर कम्पोजिंग तसेच लेआऊटसाठी श्रीमान गोकुलचंद्रदास, टायपिंग कामासाठी श्रीमान संजय, प्रूफ संशोधन तसेच संपादन कामासाठी श्री भक्तिवेदान्त माधव महारांजांची सेवाचेष्टा कौतुकास्पद आहे. ग्रंथाचे मुखपृष्ठ करण्यासाठी श्रीयुता श्यामाराणी दासीची सेवाचेष्टा अप्रतिम आहे. श्रीश्रीगुरु- गौरांग- गांधर्विका गिरिधारी या सर्वांवर प्रचूर कृपाशिर्वाद करतील.

शेवटी भगवत् करुणाचे घनविग्रह परमाराध्यत्म श्रीगुरुपादपद्म नित्यलीला प्रविष्ट ॐ विष्णुपाद अष्टोत्तरशत श्रीश्रीमत्भक्तिप्रज्ञान केशव गोस्वामी महाराज माझ्यावर प्रचूर कृपाशीर्वाद वर्षण करोत ज्यामुळे मी दीन-हीन सेवक त्यांच्या मनोऽभीष्ट सेवेत अधिकाधिक अधिकार प्राप्त करतील हीच त्यांच्या चरणी माझी सकातर प्रार्थना आहे.

श्रीहरी-गुरु-वैष्णव
कृपालेश-पार्थी
दीन-हीन त्रिदंडीभिक्षु

श्रीभक्तिवेदान्त

नारायण

श्री गिरीधारी गौडीय मठ
गोवर्धन, जिल्हा मथुरा (उ.प्र.)
२७ ऑगस्ट २००६

# श्री कृष्ण जन्मलीला

## श्रीकृष्णावतार पार्श्वभूमी (पान २-३)

कालप्रवाहानुसार द्वापार युगाचा अंत जवळ आला होता. तेंव्हा अधिकाधिक लोकांमध्ये सत्व गुण कमी होवून रज आणि तम गुणाचा प्रभाव दिसू लागला. कंस, जरासंध, पौड्रिक वासुदेव, कालयवन आदि दैत्य, दानव तसेच आसुरी स्वभावाची माणसे राज्यकर्ते बनून अनेक राज्यांवर शासन करु लागले होते. असे दुष्ट राजे कित्येक औक्षोहिणी सैनिक एकत्र करुन आपल्या दुष्ट प्रवृत्तीने प्रजेचे शोषण करु लागले. पृथ्वीवर जणू अधर्माचेच राज्य दिसत होते. पृथ्वीवर एवढे पाप वाढले की त्या वजनाने पृथ्वीमाता आकांत करु लागली. पापी राजांपासून सुटका करण्यासाठी पृथ्वीमाता गायीचे रुप धारण करुन देवतांकडे गेली. दुःखाने तिचे अंग थरथरत होते, आणि डोळ्यातून अश्रू वाहत ती आपले दुःख देवतांना सांगू लागली, “मी या पापाचारी दानवांना भार सहन करु शकत नाही. यांना आपले स्वरुप, धर्म, आत्म-धर्माचे ज्ञान नाही. अहंकारामध्ये मत्त होऊन ते केवळ दुराचारांनी वेढून गेले. ह्या अनैतिक अधर्मींचे अनुकरण करुन साधारण जनता देखिल पापी झाली आहे.” देवता पृथ्वीच्या दुःखावर काही उपाय शोधू शकले नाही. ते सर्व मिळून ब्रह्मदेव आणि शंकराकडे गेले. पृथ्वीदेवीचे भयावह दुःख पाहून संतप्त झालेले ब्रह्मदेव

सर्वांना घेवून आपले आराध्यदेव गर्भोदशायी विष्णुकडे क्षीरसाराच्या काठी आले आणि त्यांची स्तुती करु लागले, स्तुती करता करता ते समाधिस्त झाले आणि समाधी अवस्थेतच त्यांनी ऐकले आणि देवता आणि पृथ्वीला सांगितले की “परमेश्वराला पृथ्वीच्या कष्टाची जाणीव आहे. गर्भोदयशायी विष्णुने आपले प्रभू श्रीकृष्णांना जे देवाधिदेव आहे त्यांना  निवेदन केले, अतिशीघ्र सर्व कष्टांचे निवारण करण्यासाठी स्वतः श्रीकृष्ण धरणीवर अवतीर्ण होतील. तसेच असुरांचा आणि जे परमेश्वराच्या भक्ती व सत्तेवर विश्वास ठेवत नाही त्यांचा नाश करतील.

ते त्वरित युद्धकाळात अवतार घेतील. सर्व देवता युद्धकाळात जन्म घेवून त्यांच्या लीलेत सहभागी होतील. भगवान श्रीकृष्म आणि त्यांची प्रीयतमा श्रीमती राधाराणींच्या सेवेसाठी देवांगना ब्रजमध्ये जन्म घेतील. आता तुम्ही सर्वजण आपापल्या स्थानी परत जा.

हे ऐकून पृथ्वी देवी आणि अन्य देवता आपल्या कष्टाचा अंत जवळ आला हे जाणून अस्वस्थ मनाने आपल्या आपल्या स्थानी परतले.

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्।।
परित्राणाय साधुनां विनाशाय च दुष्कृताम्।।
धर्मसंस्थापनार्थाय संम्भवामि युगे युगे।।
(गीता ४/ ७-८)

भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितले-

माझ्या आविर्भावाचे हेच कारण आहे की मी स्वेच्छामयी आहे. माझ्या इच्छेनेच मी अवतीर्ण होतो. जेंव्हा जेंव्हा धर्माला ग्लानी येते आणि अधर्म पसरु लागतो, तेंव्हा तेंव्हा स्वेच्छापूर्वक मी अवतीर्ण होतो. मी आपल्या शुद्ध भक्तांसाठी, दुष्टांचा नाश करण्यासाठी आणि धर्माची स्थापना करण्यासाठी युगानुयुगे अवतरित होतो.

# श्रीकृष्णावताराचे प्रयोजन

पान ४

भगवान श्रीकृष्णाच्या जन्म घेण्याचे कारण याप्रमाणे आहे.

१. पृथ्वी आणि सुतपाची इच्छापूर्ती-

स्वायम्भुवमन्वन्तरात सुतपा नावाचे एक प्रजापति होते आणि त्यांची पत्नी होती पृथ्वी. पृथ्वी आणि सुतपाला ब्रह्मदेवाने प्रजासृष्टिची आज्ञा दिली होती. ते सर्व इंद्रिय संयत करुन कठोर तपस्या करु लागले. वर्षा, वायू, सर्दी तसेच गर्मी सहन करुन प्राणायामाद्वारे आपले चित्त शुद्ध केले. केवळ झाडांची पडलेली पाने आणि वायुंचे सेवन करुन शांतचित्ताने आपल्या अभिष्ट फळाच्या प्राप्तीसाठी परमेश्वराची आराधना करत, करत बाराहजार देववर्षे तपश्चर्या केली. त्यांच्या तपस्येने प्रसन्न होवून भगवान श्रीकृष्ण त्यांच्यासमोर प्रगट झाले आणि वर मागण्यास सांगितले. त्यांनी परमेश्वराकडे त्यांच्यासारखाच विलक्षण पुत्र व्हावा असा वर मागितला. भगवान श्रीकृष्णांनी विचार केला की मी वर तर दिला आहे, परंतु मी तो पूर्ण करु शकत नाही. कारण माझ्यासारखा दुसरा कोणी नाहीच. कोणाला कोणती वस्तू द्यायची प्रतिज्ञा करुन ती पूर्ण करता आली नाही तर त्यासारखी तिप्पट वस्तू द्यावी लागेल. माझ्यासारखा तर केवळ मीच आहे. म्हणून मी तीन वेळा यांचा पुत्र होईल. यासाठी भगवान श्रीकृष्ण स्वयं त्यांचे पुत्र रुपात प्रगट झाले आणि पृथ्वीगर्भ नावाने प्रसिद्ध झाले. दुसऱ्या जन्मात पृथ्वी आणि सुतपा, आदिती आणि कश्यप नावाने दम्पती झाले. तेंव्हा श्रीकृष्ण त्यांचे पुत्र उपेंद्र झाले. शरीर छोटे असल्यामुळे त्यांना वामनावतार देखिल म्हणतात. द्वापरयुगाच्या अंती तिसऱ्या जन्मात पृथ्वी आणि सुतपा

पान- ५

देवकी आणि वसुदेव झाले आणि आपण दिलेले वर पूर्ण करण्यासाठी श्रीकृष्ण देवकी आणि वसुदेवाच्या पुत्ररुपाने अवतरित झाले.

२. द्रोण और धराको ब्रह्माजीका वर-

द्रोण नावाचे एक वसू होते आणि त्यांच्या पत्नी नाव होते धरा. दोघांनी ब्रह्माजींची आराधना केली आणि वर मागितला-

“प्रभो जेंव्हा आम्ही पृथ्वीवर जन्म घेवू तेंव्हा आमची जगदीश्वर भगवान श्रीकृष्णांवर वात्सल्यमय भक्ती होवू दे. ब्रह्माजी म्हणाले- असेच होईल” द्वापर युगाच्या अंती द्रोण आणि धरा भगवान श्रीकृष्णांचे नित्य पिता-माता नंद आणि यशोदेच्या पुत्ररुपात जन्म घेतला.

पान- ५

३. रामावतारात वानरांच्या ऋणातून मुक्तता -

राम अवतारात सीता मातेच्या शोधासाठी आणि रावणाला युद्धात मारण्यासाठी वानरांनी भगवान श्रीरामाला खूप मदत केली होती. साधारणतः असा नियम आहे की, सेनापती आपल्या सैनिकांना कपडे, अस्त्र-शस्त्रादि, भोजन, तसेच वेतन देतो. परंतु भगवान श्रीरामचंद्र त्यावेळी वनवासी होते. त्यांच्याजवळ काही धन नव्हते. वानरांनी स्वतः आपले भरण-पोषण केले, आणि अस्त्रशस्त्राची व्यवस्था देखिल स्वतःच केली. त्यांच्या ह्या ऋणाची परतफेड (मुक्ततः) करण्यासाठी भगवान श्रीकृष्णांनी अवतरित होवून चोरुन-चोरुन पोटभर लोणी (माखन) चारले.

४. शूर्पणखेची इच्छापूर्ती- श्रीरामचंद्र वनवास काळात जेंव्हा सीताजी आणि लक्ष्मणाबरोबर पंचवटीत वास्तव्याला होते तेंव्हा रावणाची बहीण शूर्पणखा त्यांच्या रुपावर मोहित झाली. कामभावनेने आविष्ट होऊन एका सुंदर स्त्रिचा वेश घेऊन त्यांच्याजवळ आली. आणि म्हणाली- तुमच्या प्रथम दर्शनानेच माझे मन तुमच्यावर मोहित झाले.

आतापर्यंत देवतांमध्ये देखिल असे अपूर्व रुप पाहिले नाही. या कारणामुळे तुमच्यासारख्या पुरुषोत्तमाप्रती पतीची भावना ठेवून आपल्याकडे आले. मी सर्वगुणसंपन्न आहे. म्हणून आपण दीर्घकाळपर्यंत तुम्ही माझे पती व्हा. ह्या विकारयुक्त कुरुप अबला स्त्रिचा तुम्हाला काय उपयोग? हे शब्द ऐकून वाक्चतुरशिरोमणि श्रीरामचंद्र मधूरवाणीने मंद-मंद हास्य करित म्हणाले हे 'आदरणीय देवी! माझा विवाह झालेला आहे, आणि माझी पत्नी माझ्याबरोबर आहे. हे माझे लहान भाऊ लक्ष्मण मोठे शीलवान, बलवान पराक्रमी सर्वगुणसंपन्न आहेत यांचे रुप देखिल खूप सुंदर आहे. त्याच्या बरोबर पत्नी देखिल नाही. तरी जर त्यांना पत्नीची अपेक्षा असेल तर हाच तुझ्या सुंदर रुपाला योग्य पती शोभेल. तु माझा लहान भाऊ लक्ष्मणाला पतीच्या रुपात स्वीकारुन सवतीच्या भयाने रहित होवून त्यांची सेवा कर' श्रीरामचंद्रजींचे हे शब्द ऐकून कामना मोहित झालेली शूर्पणखा लक्ष्मणाजवळ गेली आणि म्हणाली- ' लक्ष्मणा! तुझ्या या सुंदर रुपाला साजेशी मीच योग्य आहे. म्हणून माझा अंगिकार करुन संपूर्ण दंडकारण्यात सुखपूर्वक विहार करु शकशील' - त्या राक्षसीचे असे वचन ऐकून लक्ष्मण हसून म्हणाला- ' हे सुंदरी! मी तर माझ्या मोठ्या भावाचा सेवक आहे. तु माझी पत्नी बनून दासी का होवू इच्छिते? माझा भाऊ संपूर्ण ऐश्वर्यांनी संपन्न आहे, माझ्याशी विवाह केलास तर वहिनीची सेविका व्हावे लागेल. म्हणून तु माझ्या भावाची लहान स्त्री हो. यामुळे तुझे सर्व मनोरथ पूर्ण होईल. हे ऐकून कामवती शूर्पणखा सीतामातेजवळ बसलेल्या श्रीरामचंद्रांकडे परत आली आणि बोलली- ह्या साधारण स्त्रीसाठी माझा आदर करित नाही, म्हणून मी ह्या तुझ्या पत्नीला खाऊन टाकते म्हणजे सवत नसल्यामुळे मी तुमच्याबरोबर सुखपूर्वक विहार करेल! सीतामातेवर भयंकर संकट आलेले पाहून श्रीरामचंद्रांनी लक्ष्मणाला आदेश दिला की ह्या राक्षसिणीला विद्रुप करुन टाक. श्रीरामचंद्रांनी अशाप्रकारे आदेश

दिल्यावर महाबली लक्ष्मणाने क्रोधाने पाहता पाहता म्यानातून तलवार काढली आणि शूर्पणखेचे नाक-कान छाटून टाकले. आपल्या प्राचीन आचार्यगणांनी ह्या लीलांची व्याख्या अशा प्रकारे केली आहे-
भगवान सर्वांची इच्छा पूर्ण करतात. जेंव्हा शूर्पणखेने श्रीरामचंद्राजवळ प्रणय व्यक्त केला तेंव्हा परमेश्वराने तो भाव मनोमन स्वीकारला आणि ती दुसऱ्या कोणाची होवू नये यासाठी

पान ७

शूर्पणखेचे नाक-कान कापून टाकले आणि तिला कुरुप बनविले. द्वापर युगाच्या अंतसमयी ती मथुरेत कुब्जाच्या रुपात जन्माला आली. तिचे रुप अत्यंत सुंदर होते परंतु ती कुबडी होती म्हणून तिचा विवाह होत नव्हता. भगवान श्रीकृष्ण कंसवधापूर्वी कुब्जाला भेटले आणि तिचा पाय आपल्या पायाने दाबून उजव्या हाताने तिची हनुवटी वर केली त्याबरोबर कुब्जाची कंबर एकदम सरळ झाली. ती अतिशय सुंदर रमणी झाली. श्रीकृष्णाच्या स्पर्शाने तिच्या हृदयातील कामभाव नाहीसा झाला आणि भगवत् प्रेम उत्पन्न झाले.

५. स्वर्ण सीतामातांची वाच्छापूर्ती-

श्रीरामचंद्रांनी एका धोब्यामुळे सीतामातेच्या पावित्र्यावर संदेह झाल्यावर लोकापवादामुळे राजाच्या मर्यादेचे पालन करताना सीतामातेला वनवास दिला. सीतामातेच्या अनुपस्थितीत जेंव्हा श्रीरामांनी अश्वमेध यज्ञ करण्याचा निर्णय घेतला तेंव्हा वशिष्ठांनी सांगितले की, पत्नीशिवाय यज्ञ संभव नाही. यासाठी सीतामातेला परत घेवून या अथवा दुसरा विवाह करा. श्रीरामचंद्रांनी दोन्ही प्रस्ताव मानले नाही तेंव्हा वशिष्ठजींनी हा उपाय सुचविला की पत्नी नसेल तर पत्नीची स्वर्ण प्रतिमा बनवून तिच्या स्थानावर आसन दिल्यावर हा यज्ञ संपन्न होईल. श्रीरामचंद्रांनी दहा हजार वर्षांपर्यंत अनेक अश्वमेध यज्ञ आणि त्याच्या दुप्पट राजसूय यज्ञांचे अनुष्ठान केले. प्रत्येक यज्ञाच्या वेळी एक-एक स्वर्ण प्रतिमा तयार केली.

प्रत्येक स्वर्ण सीतेचा श्रीरामचंद्रांबरोबर मधूर भावात रमम करण्याचा भाव होता. यासाठी त्या सर्व प्रतिमा द्वापरच्या अंती ब्रजमध्ये गोपींच्या रुपाने जन्म घेतला आणि त्यांची रमणची इच्छा पूर्तिनिमित्त भगवान श्रीकृष्णाने अवतार घेतला.

६. जनकपूरच्या राजकन्या-
सीतामातेच्या स्वयंवरासाठी आलेल्या श्रीरामचंद्रांच्या रुपावर भाळून जनकपुरीच्या इतर राजकन्यांना देखिल त्यांना पतीच्या रुपात प्राप्त करण्याची तीव्र इच्छा जागृत झाली. या सर्व राजकन्यांनी द्वापरयुगाच्या अंती वृंदावनात जन्म घेतला. श्रीकृष्णांनी त्यांची इच्छा पूर्ण केली.

७. दंडकारण्यातील ऋषी-
दंडकारण्यात अनेक ऋषी खूप वर्षांपासून तपस्या करित होते आणि गोपालमंत्राचा जप करत होते, त्यांचे हृदय शुद्ध तसेच निर्मळ झाले. श्रीरामचंद्रजी वनवासकाळात दंडकारण्यात पोहोचले तेंव्हा त्यांच्या रुपाचे दर्शन करुन त्या ऋषींच्या हृदयात आपले इष्टदेव श्रीमदनमोहनाची स्फूर्ती झाली. त्यांच्या बरोबर प्रेयसी रुपात रमण करण्याची लालसा उत्पन्न झाली. परंतु या ऋषींचे बाह्य शरीर पुरुषांचे होते. परंतु गोपालमंत्राच्या प्रभावाने प्रगटित झालेल्या आत्मस्वरुपामुळे त्यांनी स्वतःला प्रेयसी आणि परमेश्वराला निज प्रिय रुपात पाहिले. ह्या ऋषीमुनींनी देखिल द्वापरयुगात ब्रजमध्ये गोपीरुपात जन्म घेतला. आणि भगवान श्रीकृष्णाने त्यांची अभिलाषा पूर्ण केली.

८. लक्ष्मणाची मोठे भाऊ होण्याची इच्छा-
भगवान श्रीरामचंद्रांच्या लीलेत लक्ष्मण त्यांचा लहान भाऊ झाला. आणि श्रीरामचंद्रांची सर्व आज्ञा पाळण्यास बद्ध झाले. लक्ष्मण म्हणाला- जे काही निंदीत काम असते ते सर्व मला करावे लागते. जसे

सीतामातेच्या अग्निपरीक्षेसाठी चिता तयार करणे, त्यांना वनवासात एकटे सोडून येणे. आपल्या पुढच्या लीलेत मी मोठा भाऊ होईल, ज्यामुळे अशा कामासाठी तुम्ही मला आज्ञा देणार नाही. लक्ष्मणाच्या या इच्छेची पूर्तता करण्यासाठी श्रीकृष्ण त्यांचा छोटा भाऊ झाले आणि लक्ष्मणजी
बलराम रुपात अवतरित झाले.

९. बळीराजाची मुलगी रत्नमालाची इच्छापूर्ती-

भगवान श्री वामन अवतारात ब्राह्मण बालकाच्या रुपात राजा बळीकडे दान मागण्यासाठी त्यांच्या यज्ञस्थळी पोहोचले. त्यांचे ते अद्भूत रुप पाहून बळीची मुलगी रत्नमालाच्या हृदयात असे भाव आले की जर हा माझा पुत्र असता तर याला मांडीवर घेऊन दूध पाजले असते.

पान- ९

परंतु भगवान श्रीवामनदेवांनी कपटाने तीन-पद भूमी दान मागितली आणि श्रीवामन देवाने बळीचे सर्व राज्य घेवून बळीला पाशबद्ध केले, तेंव्हा रत्नमालाला अतिशय राग आला आणि तिने मनात विचार केला की, जर माझा असा पुत्र असता तर त्याला दुधाऐवजी विष पाजले असते.
रत्नमाला पुतनेच्या रुपात जन्मली आणि भगवान श्रीकृष्णांनी तिच्या दोन्ही इच्छा पूर्ण करुन तिचा उद्धार केला.

१०.जय-विजयचा उद्धार-

वैकुंठात परमेश्वराच्या दरबारात जय आणि विजय दोघे द्वारपाल होते. एक दिवस ब्रह्माजींचे चार मानस पुत्र सनक, सनंदन, सनातन आणि सनत्कुमार तिन्ही लोकात स्वच्छंद विचरण करित भगवान विष्णुच्या दर्शनासाठी वैकुठांत पोहचले. हे चारही कुमार

पान- ९

नित्य कुमारावस्थेत म्हणजेच पाच वर्षीय बालकरुपात असत आणि निर्वस्त्र होवून विचारणा करित. जेंव्हा ते प्रवेशद्वारात येवून उभे राहिले तेंव्हा जय आणि विजय या द्वारपालांनी त्यांना रोखले. हे पाहून ते कुमार

रागवले आणि त्यांनी दोन्ही द्‌वारपालांना अभिशाप दिला की, मूर्खांनो भगवान विष्णुंचे चरण तर रज आणि तम गुणांनी रहित असतात. तुम्ही दोघे यांच्याजवळ राहण्यास योग्य नाही. यासाठी तुम्ही त्वरित पापमयी असूर योनीत जा. त्यांनी अशा प्रकारे शाप दिल्यावर ते वैकुंठावरुन खाली येवू लागले तेंव्हा त्या कृपाळू महात्मांनी सांगितले- 'तीन जन्म शाप भोगून तुम्ही परत वैकुंठ लोकात याल' ते दोन्ही दितीचे पुत्र झाले- हिरण्यकश्यपू आणि हिरण्याक्ष. परमेश्वराने पृथ्वीचा उद्धार करतांना

पान- १०

श्रीवराहावतार घेवून हिरण्याक्ष आणि नृसिंहदेवाचे रुप घेवून हिरण्यकश्यपूचा वध केला. पुन्हा हे दोघे विश्रवा मुनीद्‌वारे केशिनीच्या गर्भात राक्षसांच्या रुपात जन्मले. त्यावेळी देखिल प्रभूरामचंद्रांनी त्यांना शापमुक्त करण्यासाठी त्यांचा वध केला. तिसऱ्या जन्मात ते शिशुपाल आणि दंतवक्र झाले. भगवान श्रीकृष्णांनी आपल्या सुदर्शन चक्राने त्यांचा वध केला आणि शापमुक्त करुन पुन्हा वैकुंठधाम प्रदान केले.

११.परित्राणाय साधूनां-

दास्य, सख्य, वात्सल्य तसेच श्रृंगार आदि विविध रसांद्‌वारे आपल्या प्रेमी भक्तांना आनंदित करणे, विशुद्ध प्रेम

पान- १०

रसास्वादनाद्‌वारे स्वतः सुखी होवून भक्तांनादेखिल आपल्या प्रेम रसास्वादनाद्‌वारे सुखी करणे. अशा प्रकारे अतिशय विरह कातर भक्तांची वेदना शांत करण्यासाठी अवतरित होणे.

१२.विनाशायच दुष्कृताम्-

भक्तांसाठी साधुद्रोही कंसादी असुरांचा विनाश करणे, दुर्दांत दैत्यांच्या दुर्दमनीय सेनेच्या भाराने दुःखी झालेल्या पृथ्वीला भाररहित करण्यासाठी अवतार घेतला.

१३.अनुग्रहाय भक्तानां-

आपल्या मधूर लीलाचरित्रांद्वारे आत्माराम मुनींना आपल्या प्रेमभक्तीकडे आकर्षित करण्यासाठी अवतरित झाले.

श्रीकृष्णांनी अवतरित होवून भगवत् गीतेद्वारे आत्मधर्माची स्थापना केली. श्रीमद्भागवतामध्ये उद्धव संवादाद्वारे प्रेम-धर्माची स्थापना केली गेली. वास्तविक श्रीकृष्ण प्रेम-धर्माच्या स्थापनेसाठी पृथ्वीवर अवतरित झाले होते. अशाप्रकारे त्यांनी आपला उद्देश अपूर्व रुपाने महिमा मंडित केला. त्यांच्या अवतार ग्रहण करण्याच्या कारणात मुख्यातिमुख्य अंतरंग कारण आहे. त्यांचा हा गुण जो श्रीचैतन्यचरितामृत ग्रंथात कृष्णदास कविराज गोस्वामींनी दिली आहे. रसिक शेखर परम करुण।

श्रीकृष्ण रसिक शेखर आहेत अर्थात सर्व रसांचे आस्वादक आहेत, स्वयं रसस्वरुप आहेत. जसे श्रुतीमध्ये सांगितले रसौवैसः। श्रीकृष्ण अद्वितीय तत्व आहे. ते आपल्या नित्य अप्राकृत (चिन्मय) गोलोकधामात विहार करतात आणि अनेकानेक मधूर लीला करुन आपल्या भक्तांना आनंद देवून स्वतः त्या सगळ्या लीलांचे आस्वादन करतात.

इथे प्रश्न असा उठतो की, ते आपल्या अप्राकृत (चिन्मय) गोलोक धामात विहार करतात. मग ह्या प्राकृत (पृथ्वीवर) मर्त्य जगात आपल्या परिकरांसहित, गोप-गोपींसहित प्रगट होवून जन्म, माखनचोरी, रासलीला आदी लीला प्रकाशित करतात? वास्तवात या धराधामावर आपल्या लीला प्रगट करुन आपल्यासारख्या बद्धजीवांवर करुणेचा प्रकाश करणे हा उद्देश आहे. जे ह्या लीला पाहतात ते सुकृतीवान जीव प्रेम प्राप्त करुन भगवतधामात प्रवेश करतात. ते परत पृथ्वीवर जन्मग्रहण करित नाही. भविष्यात जे जीव ह्या लीलांचे श्रवण-कीर्तन करतील त्यांच्या हृदयात

श्रीकृष्ण लीलांद्वारे प्रवेश करुन, चित्त शुद्धिद्वारे आपली सेवा वासना जागवून, त्यांना आपले प्रेम प्रदान करुन कृतार्थ करतात. याचे उदाहरण आहे श्रुती, रासलीला श्रवण करुन ज्यांच्या

पान- ११

मनात श्रीराधा आदी गोपींसारखी श्रीकृष्ण सेवेची कामना उत्पन्न झाली. दंडकारण्य निवासी मुनीजन श्रीरामचंद्रांच्या रुपावर मुग्ध झाले. भगवान रामचंद्र मर्यादेमध्ये होते म्हणून त्यांनी मुनींचे मनोरथ श्रीरामरुपात नाही तर कृष्णावताराच्या वेळी श्रीयशोदानंदन रुपात पूर्ण केले.

अनुग्रहाय भक्तानां मानुषं देहमाश्रितः।
भजते तादृशीः क्रीडायाः श्रुत्वा तत्परो भवेत।।

(श्रीमतभागवत १०/३३/३६)

भगवान भक्तावर कृपा करण्यासाठीच आपली नरलीला ह्या अलौकिक जगात प्रकट करतात आणि अशी लीला करतात ज्या ऐकून जीव भगवतपरायण होतो.

पान- १२

त्यांच्या कृपा-अनुग्रहाची व्याख्या करणे असंभव आहे. ते स्वतः गोपींच्या प्रेमाचे ऋणी होवून म्हणतात-

न पारयेऽहं निरवद्यसंयुजां स्वसाधुकृत्यं विबुधायुषापि वः।
या माभजन् दुर्जरगेह श्रृंखलाः संवृश्यः तद्वः प्रतियातु साधुना।।

(श्रीमतभागवत १०/३२/२२)

मी ब्रह्मदेवाचे आयुष्य मिळवून देखिल तुमच्या निर्मळ आणि निर्दोष सेवेचे ऋण चुकवू शकणार नाही कारण तुम्ही माझ्या भजनासाठी दुर्जर गृह श्रृंखला तोडल्या (गृहत्याग केला) मी तुमचा जन्म-जन्माचा ऋणी आहे. तुम्ही आपल्या सौम्य स्वभावाने, प्रेमाने मला ऋणकरुण केले आहे. परंतु मी तर तुमचा ऋणीच आहे.

म्हणून भगवान श्रीकृष्णाने पूर्वोक्त सांगितलेल्या कारणांनी अवतार घेण्याच्या इच्छेने लौकिक लीलांचा अवलंब करुन अप्राकृत गोलोकधाम

आणि परिकर-वृदांना मायिक प्रपंचांतर्गत (संसारात) भूलोकात प्रकाशित केले.

## श्रीकृष्ण जन्माची पार्श्वभूमी

यदुवंशात देवमीढ नावाचे एक सम्राट मथुरेत निवास करित होते. त्या क्षत्रिय शिरोमणि राज्याच्या दोन भार्या होत्या. एक क्षत्राणी आणि दुसरी गोपकुळातील. क्षत्राणी पत्नीपासून शूरसेन आणि गोप पत्नीपासून पर्जन्यजींचा जन्म झाला. शूरसेनाला वासुदेव पुत्र झाला. पर्जन्यजींनी गोपकुळानुसार गवळ्यांचे अधिपत्य स्वीकारले. त्यांना पाच पुत्र झाले. उपनंद, अभिनंद, नंद, सन्नद आणि नदंन आणि दोन मुली सुनंदा आणि नंदिनी. यामध्ये श्रीनंदजी समस्त परिवाराच्या प्रेमाच्या संपत्तीचे आधार होवून सर्वांच्या मधले होते. गोपांमध्ये प्रधान सुमुख नानाच्या गोपाने नंदजींना परमधन्या आपली कन्या यशोदेचा विवाह केला. पर्जन्यजींनी आपला मोठा मुलगा उपनंदला गोकुळचा राजा केले. त्यानंतर उपनंदजींनी आपल्या मधल्या भावाला जे सर्वगुणसंपन्न तसेच सर्वांच्या प्रिय नंदजींना राजतिलक करुन राज्यभार त्यांच्यावर सोपविला.
राजा श्रीदेवमीढने शूरसेनवर राज्यभार सोपविला. त्यावेळी मथुरा नगरी राजा शूरसेन आणि राजा उग्रसेन या दोघांची राजधानी होती. शूरसेनाचा पुत्र वासुदेवाचा विवाह उग्रसेनचे धाकटे बंधू देवक याची मुलगी देवकी बरोबर झाला. उग्रसेनचा पुत्र कंस याची बहीण देवकीचा विवाह संपन्न झाला. या विवाहाने कंस खूप आनंदित झाला. नवविवाहित दांपत्याला स्वर्णरथावर बसवून त्यांना घेऊन जाण्याकरिता त्याने स्वतः सारथ्य केले. त्याच्या कमरेला म्यानात तलवार होती. त्याच्या डाव्या हातात घोड्यांचा लगाम आणि उजव्या हातात चाबुक होता. रस्त्याने जाता जाता अचानक आकाशवाणी झाली, “असे मूर्ख कंसा! ज्यांना तु रथात बसवून घेऊन चाललायस त्यांचाच आठवा पुत्र तुझा कर्दनकाळ बनेल!”

हे ऐकताच कंस चवताळून रथावरुन खाली उतरला, त्याने एका हाताने म्यानातून तलवार काढली आणि दुसऱ्या हाताने देवकीचे केस पकडून तिचा शिरच्छेद करायला सरसावला. त्याने विचार केला की जर देवकीच नाही राहिली तर तिला अपत्य होण्याचा प्रश्नच उद्भवणार नाही. मला मारणारा जन्मालाच येणार नाही. तेंव्हा देवकीचा वध करणेच उचित आहे.

हे एका नास्तिक व्यक्तिचे लक्षण आहे. कंसाला वाटले की ही आकाशवाणी मिथ्या नाही, सत्य आहे, परंतु देवकीचा वध करुन मी ती असत्य करीन. त्याला हे अनुमान लावता आले नाही की जर आकाशवाणी सत्य आहे तर मी ती कशी थांबवू शकतो? परंतु तो काहीच करु शकला नाही. आपल्या मृत्यूच्या भीतीने, तथा आकाशवाणी असत्य करण्याकरिता त्या नास्तिक, पापी, दुष्ट आणि भोजवंशाला कलंक असणाऱ्या कंसाने म्यानातून तलवार उपसून देवकीचा वध करण्याचा निश्चय केला. त्याचे हे क्रूर कर्म पाहून वसुदेवजी कंसाला शांत करित म्हणाले- "तुम्ही तुमच्या नवपरिणित बहिणीचा वध का करताय? एक म्हणजे ती स्त्री आहे आणि दुसरे म्हणजे ती तुमची बहिण आहे. शिवाय ही विवाहाचा शुभप्रसंग आहे. कुठलाही वीर पुरुष स्त्रीवर हात उचलत नाही. परंतु तुम्ही मात्र एका स्त्रीचा वध करितच आहात शिवाय आपल्या अत्यंत लाडक्या अशा छोट्या बहिणीचा वध करणार आहात. तुम्ही असे कदापी करु नये. शूरवीरांच्या सभेत तुमच्या बळाचा, तुमच्या वीरतेचा अत्यंत सन्मान केला जातो. एका स्त्रीचा वध करुन तुम्ही तुमच्या यशाला, कलंकित करु नका!"

वसुदेवांना दृढ विश्वास होता की आकाशवाणी सत्य होणारच. देवकीचे आठवे आपत्य कंसाचा निश्चितच वध करणार. परंतु आता येऊ घातलेल्या मृत्यूला टाळणेच योग्य ठरणार आहे. ते कंसाला म्हणाले- "राजकुमार! जो जन्माला येतो त्याचा मृत्यूही त्याच्याबरोबरच उत्पन्न होतो. आज असो किंवा शतकानंतर मरण येणारच. हा तर सृष्टीचा नियमच आहे. मग तुम्हाला मृत्युचं इतकं भय का असावं? त्याचप्रमाणे आकाशवाणीनुसार

तुम्हाला देवकीपासून काहीच धोका नाही. धोका तर तिच्या पुत्रापासून आहे. तेंव्हा तिच्या पुत्रांना जन्मतःच मी आपल्या हाती आणून सोपवीन, आता मात्र तुम्ही देवकीचा वध करु नका."

कंसाचा वसुदेवजींच्या बोलण्यावर विश्वास होता. तो पुरता जाणून होता की वसुदेवजी धार्मिक आणि परम सत्यवादी आहेत. म्हणून मग त्याने देवकीला जीवे मारण्याचा विचार सोडून दिला. त्या जोडप्याला स्वगृही जाऊ दिले. परंतु नंतर त्याने वसुदेवजींच्या घराभोवती सशस्त्र सैनिकांचा कडक पहारा ठेवून त्यांना त्यांच्या घरातच नजरकैदेत ठेवले, जेणेकरुन वसुदेवजी कुठे पळून जाऊ नयेत.

योग्य वेळी देवकीचा पहिला पुत्र जन्मला. वसुदेवजींनी देवकीला त्या वचनाची आठवण करुन दिली आणि उद्गारले, "मी तुझ्या प्राणांच्या रक्षणाकरिता कंसाला वचन दिले होते की तुझ्या पुत्रांना जन्मतःच त्याच्या हाती सुपूर्द करीन, तेंव्हा तुझा हा पुत्र माझ्याकडे दे." वसुदेवजींचे हे बोलणे ऐकताच देवकी ओक्सबोक्शी रडू लागली आणि प्रार्थना करित म्हणाली- "माझा भाऊ कंस याला माझ्या आठव्या पुत्रापासून भय आहे, या पहिल्या पुत्रापासून नव्हे, तेंव्हा याला माझ्याजवलच राहू द्या."

वसुदेवजी त्यावर उत्तरले, "मला मी दिलेलं वचन पाळलंच पाहिजे, आणि मी जर तसं केलं नाही तर याला बलपूर्वक घेऊन जाईल. म्हणून म्हणतो की याला कंसाच्या स्वाधीन करणेच हितावह आहे." असं म्हणून वसुदेवजींनी देवकीच्या मांडीवरुन ते नवजात अर्भक आपल्या हाती घेतलं आणि आंक्रदणाऱ्या देवकीला तसंच मागे ठेवून ते कंसाच्या हाती सोपविलं.

कंस जोरजोरात अट्टाहास करित म्हणाला, "वसुदेवजी! तुम्ही खरोखरीच परम सत्यवादी आहात. मला तुमच्या बालकापासून कुठल्याही प्रकारचे बय नाही, कारण आकाशवाणीने तर आठव्या गर्भातून उत्पन्न होणाऱ्या पुत्राला माझा काळ सांगितलाय. मी या सुकुमार बालकाची उगीचच हत्या करुन पापाचा भागिदार होऊ इच्छित नाही. तेंव्हा तुम्ही त्याला घेऊन जा."

वसुदेवजींना ठाऊक होतं की कंस महादुष्ट आहे, कुठल्याही क्षणी तो

आपले विचार, आपलं मत बदलू शकतो, म्हणून त्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवला नाही.

इथे श्री नारदमुनी भ्रमण करता-करता कंसाकडे आले. कंसाने आदर सत्कार करुन त्यांना यथोचित आसन दिलं, कारण कंस नारदजींना आपला गुरु मानत होता. नारदजींनी त्याला क्षेमकुशल विचारले असता कंसाने त्यांना घडलेली सगळी कहाणी सांगितली. हे ऐकून नारदजी कंसाची भर्त्सना करित म्हणाले- "अरे निर्बुद्ध कंसा! तुला कसे कळत नाही की जोपर्यंत देवकीचा आठवा पुत्र जन्म घेईल तोपर्यंत त्याचे पहिले सात भाऊ मोठे झालेले असतील आणि मग ते त्या आठव्या पुत्राबरोबर एकत्र येऊन तुझा वध करतील. सात वेळा चक्रार मोजणी झाल्यानंतरही सगळे अंक आठच ठरतात! देवता अत्यंत चतुर असतात. त्या कुणाला आठवा आणि कुणाला प्रथम बनवतील हे तुझ्या लक्षात देखील यायचे नाही. तुझ्या घातकाच्या संख्येप्रमाणे मोजायचेच झाले तर प्रथम बालक सुद्धा आठवे असू शकते, कारण देवतांची तर 'वामतोगती' आहे. सगळ्या देवता तुझ्याविरुद्ध षड्यंत्र करु पहातायत. सगळे यादव वास्तविकपणे देवताच आहेत आणि त्यांच्या पत्नींनीसुद्धा यदुवंशात जन्म ग्रहण केलाय. ही सगळी जणं मिळून तुझ्या वधाची तयारी करित आहेत आणि या कामी ते श्रीविष्णुंची सहाय्यता करित आहेत."

नारदजींनी असा दुर्बुद्धिपूर्ण सल्ला कंसाला दिला ते आठव्या पुत्राची स्वाभाविक रुपाने जन्म घेण्याची प्रतिक्षा करु शकले नाहित. त्यात बराच वेळ जाणार होता. त्यादरम्यान कंसाने समस्त विश्वाचा संहार केला असता. म्हणून कंसाचा अतिशीघ्र वध होणं अत्यावश्यकच होतं. जर त्याने नवजात अर्भकांची हत्या केली तर त्याच्या पापांमध्ये वृद्धी होईल आणि भगवंतांचा अवतार शीघ्र होईल.

नारदजींचं म्हणणं ऐकून कंस क्रोधाने उन्मत्त झाला. त्याचा नारदजींच्या बोलण्यावर विश्वास होता. त्याने तत्क्षणीच यादवांचा संहार करण्याचा निश्चय केला. वसुदेव आणि देवकीला मजबूत बेड्यांनी बांधून कारागृहात

बांधून ठेवले आणि देवकीच्या प्रथम गर्भातून उत्पन्न झालेल्या त्या नवजात बालकाला शिळेवर आपटून मारुन टाकले. त्याचं हे कुकृत्य पाहून यदुकुल नरेश उग्रसेन अत्यंत कृद्ध झाले. जेंव्हा त्यांनी कंसाला अत्याचार करण्यापासून थांबविण्याचा प्रयत्न केला तेंव्हा दुष्ट आणि मदमत्त कंसाने आपल्या पित्याला बंदी बनवून स्वतः राज्यपद बळकावले. त्याने मथुरा आणि शूरसेनाच्या राज्याची सगळी संपत्ती हडपून त्यावर बळजबरीने आपला अधिकार सिद्ध केला. कंस स्वतः अत्यंत बलशाली होता, तसंच प्रलंबासूर, बकासूर, अघासूर, चाणूर, मुष्टिक, केशी, अरिष्टासूर, धेनुक, द्विविद आणि पूतना हे सगळे त्याचे साथीदार होते. कंसाचे बळ आणि पौरुषेय पाहून मगध नरेश जरासंधाने आपल्या दोन मुली अस्ति आणि प्राप्ती यांचा विवाह कंसाशी करविला होता. जावई असल्यामुळे कंसाला जरासंधाची बरीच मदत होत होती. बाणासूर तथा भौमासुरासारखे दैत्य त्याचे सहाय्यक होते. या सगळ्यांबरोबर तो यदुवंशींचा संहार करु लागला. ते सगळे भयभीत होऊन वेगवेगळ्या देशात पलायन करु लागले. काहीजण इच्छा नसतांना वरवर त्याची मर्जी सांभाळत त्याची सेवा करु लागले. एक-एक करित कंसाने देवकीच्या सहाही पुत्रांची हत्या केली. त्यानंतर देवकी पुन्हा गर्भवती झाली. यावेळी धामतत्व प्रकाशक स्वयं बलदेवजी आपल्या अंश रुपात सप्तम् गर्भात स्थानापन्न झाले. वसुदेवजींच्या अन्य पत्नींपैकी जमेल तेंव्हा कारागृहात देवकी आणि वसुदेव यांची सेवा करण्याकरिता येत असे. देवकीने जेंव्हा सातवा गर्भ धारण केला त्यावेळेस रोहिणीसुद्धा गर्भवती झाली. बलदेव प्रभू आपल्या पूर्ण रुपात रोहिणीदेवींच्या गर्भात प्रविष्ट झाले. दोन तीन महिन्यांनंतर वसुदेव महाराजांनी विचार केला की जर रोहिणीदेवी इथेच मथुरेत राहून बालकाला जन्म देणार असतील तर तो दुष्ट कंस त्यालाही जीवे मारेल म्हणून त्यांनी रोहिणीदेवीला गुप्तरुपाने गोकुळात पाठविण्याची योजना आखली. योगमायेच्या प्रेरणेने वसुदेवजींनी असे केले. रोहिणीदेवी नंतर गोकुळी गेल्या जिथे त्यांनी अनेक वर्षे वास केला.

इथे श्रीकृष्णाने आपली पराशक्ती असलेल्या योगमायेला आदेश दिला- "देवी! तु व्रजधामी जा, तिथला प्रदेश गाई आणि गवळ्यांनी सुशोभित आहे. तिथे नंद गोकुळात वसुदेवजींची पत्नी रोहिणी निवास करित आहे. त्यांच्या अन्य पत्नी देखिल कंसाच्या भीतीने निरनिराळ्या ठिकाणी गुप्तरुपाने रहात आहेत. यावेळी संकर्षण नामक माझं विशेष तेज देवकीच्या उदरात सप्तम् गर्भाच्या रुपात वाढत आहे, त्याला तिथून विस्थापित करुन रोहिणीच्या गर्भात स्थापित कर. मी अंशरुपाने देवकीचा पुत्र होईन आणि तु गोकुळात यशोदेच्या गर्भात जन्म ग्रहण कर. माझ्या कृपेने तु सगळ्यांना त्यांचं मनोवांछित फल प्रदान करण्यास सक्षम होशील. पृथ्वीवरील लोक तुझ्या पूजेकरिता अनेक क्षेत्र बनवतील आणि दुर्गा, भद्रकाली, विजया, वैष्णवी, कुमुदा, चण्डिका, कृष्णा, माधवी, कन्या, माया, नारायणी, ईशानी, शारदा आणि अंबिका अशा अनेक नावांनी तुला संबोधतील. अशाप्रकारे योगमायेच्या प्रभावाने देवकीच्या गर्भात स्थित असलेले संकर्षण बलदेव रोहिणीच्या गर्भात स्थित असलेल्या पूर्ण बलदेव प्रभुंबरोबर मिळून एकाकार झाले. जेंव्हा योगमायेने देवकीचा गर्भ रोहिणीच्या गर्भात स्थापित केला तेंव्हा मथुरावासी मोठे दुःखीकष्टी होऊन आपापसात म्हणाले, "हाय हाय! बिचाऱ्या देवकीचा हा गर्भ देखिल नष्ट झाला."

दरम्यान गोकुळात श्रीनंद आणि यशोदा यांच्या विवाहास अनेक वर्षे लोटल्यानंतरही त्यांना अपत्य प्राप्त झाले नव्हते. प्रौढावस्था आल्या कारणाने संतान प्राप्तीची आशासुद्धा संपुष्टात आली होती. नंदबाबांना संसारातून विरक्ती आली होती. एक दिवस नंदबाबांना अशी अंतःस्फूर्ती झाली. जणुकाही एक श्यामवर्णाचे, कमलनयन, अपूर्व दिव्य सुंदर बालक यशोदेच्या मांडीवर खेळत आहे. त्यांनी जेंव्हा याविषयी एकांतात यशोदेला सांगितले तेंव्हा यशोदा म्हणाली, "हल्ली मलाही स्वप्नात अगदी असेच परमसुंदर बालक माझ्या मांडीवर खेळतांना दिसते."

त्यानंतर असा अलौकिक पुत्र प्राप्त करण्याची अभिलाषा अत्यंत तीव्र झाल्यानंतर एकदा भगवान् श्रीनारायण दोघांच्याही स्वप्नात प्रकट होऊन म्हणाले, “अहो! जे परमसुंदर बालक तुम्हाला अंतःस्फूर्ती देत आहे ते साक्षात् श्रीकृष्ण तुमचे नित्यपुत्र आहेत. प्रत्येक कल्पात आपल्या भक्तीच्या प्रचारार्थ ते तुम्हा दोघांच्याद्वारेच जन्म ग्रहण करतात. ज्या द्रोण आणि धराने ठरोर तपस्या करुन ब्रह्मांजींकडून श्रीकृष्णांप्रति वात्सल्य प्रेम मागितले, ते तुम्हा दोघांचे अंश वा कलास्वरुप आहेत. तुम्हा दोघांची ही सुमधूर इच्छा शीघ्र पूर्ण होईल.”
हे ऐकून श्रीनंद आणि यशोदेचे हृदय आनंदातिशयाने भरुन गेले. त्याचवेळेस गोकुळात एक तपस्विनी एका स्नातक ब्रह्मचाऱ्यासोबत येऊन पोहोचली. तिच्या लक्षणांवरुन ती महाप्रभावशालिनी वाटत होती म्हणून सगळ्यांनी तिचा यथोचित आदर सत्कार केला. तपस्विनी म्हणाली- “माझं नाव पौर्णमासी आहे, मी बालब्रह्मचारिणी आहे तथा सदैव अर्धवृद्धा अवस्थेत असते: या ब्रह्मचाऱ्याचे नाव मधुमंगल आहे. ब्रजराज श्रीनंदांच्या घरी लवकरच एका पुत्राचा जन्म होणार आहे.” हे ऐकून समस्त ब्रजवासीगण अत्यंत आनंदित आणि अश्रूपूर्ण झाले. त्यांनी भगवती पौर्णमासीकरिता यमुनेच्या काठावरती एक पर्णकुटी बांधली. तेंव्हापासून त्या व्रजधामी वास करु लागल्या. माघ मासातील कृष्णपक्षीय प्रतिपदा तिथीच्या एका रात्री यशोदाजी ब्रजराजांची सेवा करित असतांना त्यांना स्वप्नवत् साक्षात्कार झाला की तेच बालक एका कुमारिकेच्या (योगमाया) द्वारा आपल्या अंगाला आच्छादित करुन श्रीब्रजराजांच्या हृदयातून निघून त्यांच्या हृदयातून निघून त्यांच्या हृदयात प्रवेशित होत आहे. श्रीब्रजराजांनासुद्धा आपल्या अंतरात त्यांच्या होणाऱ्या प्रवेशाची जिवंत अनुभूति झाली, परंतु भावविभोर झाल्याकारणाने ते काहीच बोलू शकले नाहित. त्यानंतर यशोदेच्या ठायी गर्भलक्षणे जाणवल्यानंतर सगळ्या गोपी मांगलिक पदार्थ घेऊन त्यांच्याकडे आल्या तथा सगळे ब्रजासीगण आनंदसागरात निमग्न झाले.

तिकडे मथुरेत अंशस्वरुपात भगवान वसुदेवांच्या मनात आपल्या अंशकलांसहित प्रविष्ट झाले. साक्षात भगवान हृदयात प्रविष्ट झाल्यामुळे त्यांना धारण करणारे वसुदेवजी सूर्यासमान तेजस्वी झाले आणि त्यांना बघतांना लोकांचे डोळे दिपून जात होते. ज्याप्रमाणे पूर्व दिशा चंद्रदेवास ग्रहण करते त्याचप्रमाणे शुद्ध सत्वाने संपन्न देवकीने भगवंताला वसुदेवांच्या हृदयातून आपल्या हृदयात धारण केले. भगवान देवकीच्या हृदयातून येऊन तिच्या गर्भात विराजमान झाले.

बद्धजीवांना आपल्या कर्मफळाप्रमाणे विभिन्न योनींमध्ये तशाच माता-पित्यांच्या पोटी जन्म ग्रहण करावा लागतो. आणि त्यांचा जन्म पित्याद्वारे आपले शुक्राणू मातेच्या गर्भात स्थापित करण्याच्या फलस्वरुप होत असतो. परंतु भगवान परम स्वतंत्र आहेत. म्हणून ते स्वेच्छेने आपल्या मात्या-पित्याची निवड करित असतात आणि इतर यःकश्चित बद्ध जीवांप्रमाणे त्यांचा 'शौक्रजन्म' होत नाही. कारण भगवंताचं शरीर चिन्मय आहे अर्थात त्यांच्यात आणि त्यांच्या शरिरात कुठलाही भेद असतो. <u>(येथे 'नसतो' असावे असे वाटते वहित नजरचुकीने 'असतो' लिहीले असावे कृपया पडताळून पाहणे)</u>

देवकीच्या गर्भात भगवान जेंव्हा विराजमान झाले तेंव्हा तिच्या शरिराच्या दिव्य तेजामुळे सगळे कारागृह झगमगू लागले. कंसाने हे पाहिल्यानंतर विचार केला,"यावेळेस मात्र माझ्या प्राणांचा संहारक विष्णुने हिच्या गर्भात अवश्य प्रवेश केला आहे. आता मला लवकरच स्वसंरक्षणाचा उपाय करायला हवा. परंतु मी हिचा वधही करु शकत नाही कारण ती एक स्त्री आहे, माझी बहिण आहे, त्याचबरोबर ती गर्भवतीही आहे. हिचा वध केल्यास माझी कीर्ती यश आणि आयुष्य नष्ट होईल. म्हणून मला हिचे अपत्य जन्माला येईपर्यंत प्रतिक्षा करायलाच हवी." कंस आपल्या हृदयात भगवंताच्या प्रति दृढ वैर-भाव ठेऊन झोपेत, जागेपणी, खाता-पिता, उठता-बसता, चालता-फिरता, सदासर्वदा श्रीकृष्णाचेच चिंतन करु लागला. जिथे त्याची दृष्टी पडे, थोडी जरी चाहूल लागे, तिथे सर्वत्र त्याला श्रीकृष्णाचेच

दर्शन होऊ लागले. अशाप्रकारे त्याला समस्त जगत् श्रीकृष्णमय दिसू लागले.
भगवान् श्रीकृष्ण गीतेचा सर्वश्रेष्ठ उपदेश देतांना म्हणतात- 'मन्मना भव' अर्थात् आपल्या मनाला पूर्ण रुपाने माझ्यात निवेशित करा. साधक-भक्त कठोर साधना करुन आपल्या मनाला सर्वदा भगवंतांच्या चिंतनात निमग्न ठेवण्याचा प्रयत्न करतात. परंतु त्यातले काही विरळेच असे करु शकतात. परंतु इथे मात्र आपण पहातो की कंसाचं मन तर सदा-सर्वदा श्रीकृष्णाच्या चिंतनात रत होते, मग कंस अशा साधक भक्तांपेक्षाही श्रेष्ठ ठरतो का? याचं उत्तर श्रीलरुपगोस्वामीपाद आपल्या भक्तिरसामृतसिंधू ग्रंथात भक्तिची व्याख्या करतांना देतात-
"अन्याभिलाषिता शून्यं ज्ञान-कर्माद्यनावृतम्।
आनुकुल्येण कृष्णानुशीलनं भक्तिरुत्तमा।।"
श्रीकृष्णाचं अनुकूल भावनांनी केलेलं चिंतनच खऱ्या अर्थाने भक्ती आहे. कंसाचा भाव श्रीकृष्णाप्रति प्रतिकूल आहे, तो शत्रूभावाने त्याचे चिंतन करतो, त्यामुळे याला भक्ती म्हणता येत नाही.
भगवान श्रीकृष्ण देवकीच्या गर्भात विराजमान झालेत हे कळल्यानंतर शंकरजी ब्रह्माजी आपल्या अनुचरांसोबत, देवतांसोबत, नारदादी, ऋषिंसोबत कंसाच्या कारागृहात आले. हे सगळेच सुमधूर वचनांनी श्रीहरिची याप्रमाणे स्तुती करु लागले.
सत्यव्रतं सत्यपरं त्रिसत्यं सत्यस्य योनिं निहीतं च सत्ये।
सत्यस्य सत्यमृतसत्यनेत्रं सत्यात्मकं त्वां शरणं प्रपन्नाः।।(श्रीम.भा.१०.२.२६)
"प्रभो! आपण सत्यसंकल्प आहात. सत्यच आपल्या प्राप्तिचे श्रेष्ठ साधन आहे. पाखंडींना आपण प्राप्त होऊ शकत नाही. सृष्टीच्याही पूर्वी, प्रलयाच्याही पश्चात् आणि संसाराच्या स्थितीसमयी सुद्धा आपण नित्यविद्यमान असता, म्हणूनच भगवन् आपण परमसत्य आहात. आपणच सृष्टीचे सक्रिय मूल-तत्व आहात तथा पृथ्वी, जल, तेज, वायू

आणि आकाशाचे सत्य कारण आहात, तसंच त्यांच्यात अंतर्यामी रुपात विराजमान आहात. आपण समदर्शी आहात तसंच आपला आदेश सर्वांकरिता

पान २१

पालनीय आहे. आपण सत्यस्वरुप आहात म्हणून आम्ही सगळे आपल्या शरणागत आहोत."

"आपण ज्याप्रमाणे मत्स्य, हयग्रीव, कच्छप, नृसिंह, वराह, हंस, राम, परशुराम, वामन आदि अवतार धारण करुन आमची आणि या तिन्ही लोकांची रक्षा केली, त्याचप्रमाणे यावेळीसुद्धा पृथ्वीचा भार हरण करा."

तदनंतर देवकीजींना संबोधित सगळे म्हणाले- "साक्षात भगवंत आपल्या गर्भात विराजमान झाले आहेत. म्हणून आता आपण कंसापासून थोडंही भयभीत होऊ नका कारण आपले हे पुत्र लवकरच त्याचा वध करणार आहेत."

अशाप्रकारे स्तुती करुन समस्त देवतागण निघून गेले.

पान २२

श्रीबलराम आविर्भाव (प्रगटीकरण)

इकडे गोकुळात रोहिणी मय्याच्या गर्भात श्रीबलराम प्रभू दिसामासाने वाढू लागले. ते चौदा महिने गर्भात राहिले आणि शुभ तिथी दशायुक्त श्रावण मासात श्रवण नक्षत्रात पौर्णिमासेत नंदभवनात, भगवान श्रीकृष्णाचे अभिन्न स्वरुप, त्यांचे प्रथम विस्तार, अखंड गुरुतत्व गौर-वर्णशाली श्रीबलराम रोहिणीच्या पोटी जन्म घेतला. त्यांचे मुख निष्कलंक पूर्ण चंद्रमासारखे, नेत्र कमलासारखे, नवजलधरसमान केस-कलाप आणि शरत्कालीन मेघासारखे शुभ्रवर्णाचे असे रुप प्रगट झाले. सूर्यासारखे तेजस्वी श्रीबलराम जन्मापासूनच मंद बालकासारखे दिसत होते. त्यांनी आपले डोळे देखिल खोलले नाहित कारण ते सर्वप्रथम आपला धाकटा

भाऊ श्रीकृष्णाचे दर्शन करणार होते. ज्यांचा जन्म आठ दिवसाने होणार होता.

पान २२

काही ब्रजवासिंचे म्हणणे होते की बलदेव प्रभूंचा जन्म भाद्रपद शुक्ल षष्टीला झाला. ते बलदेव षष्टी साजरी करतात. श्रील रुपगोस्वामी श्रील सनातन गोस्वामी, श्रीलजीव गोस्वामी तसेच गोस्वामींचे मत आहे की जर असे मानले तर बलदेव प्रभू श्रीकृष्णापेक्षा छोटे आहेत, जर असा विचार केला की बलदेव प्रभू मोठे आहेत तर त्यांचा जन्म श्रीकृष्णापेक्षा जवळ-जवळ एका वर्षाने मोठा असेल. श्रीमद् भागवतात असे वर्णन आहे की दोघे एकत्र नंदभवनात गुडघ्यावर चालायला शिकले. रांगू लागले. दोन्ही बालकांचा नामकरण संस्कार एकत्र झाला. दोघांचा अन्नप्राशन संस्कार देखिल एकत्र झाला. श्रीकृष्णजन्मानंतर जेंव्हा यशोदा आणि रोहिमी मातेने त्या दोन्ही मुलांना (शिशुंना) एकाच पाळण्यात झोपविले तेंव्हा बलदेव प्रभूंनी प्रथम डोळे उघडून सर्वप्रथम श्रीकृष्णाचे दर्शन घेतले. यासर्व गोष्टींवरुन हे सिद्ध होते

पान २३

की, बलदेव प्रभूंचा जन्म श्रावण पौर्णिमेला झाला होता.

## <u>श्रीकृष्णजन्म</u>

सर्व गुणांनी युक्त वैवस्वत मनवन्तराच्या अठ्ठाविसाव्या चतुर्युगाच्या भाद्रपद महिन्याच्या कृष्णपक्षाच्या अष्टमी तिथी बुधवारी अर्थ-रात्री हर्षण योगात दोष स्पर्श रहित रोहिणी नक्षत्र होते. आकाशात सर्व नक्षत्र तारे ग्रह शांत होते. सर्व दिशा प्रसन्न होत्या. पृथ्वीवर सगळीकडे मंगलमय वातावरम होते. खाणींमध्ये हिरे आणि प्रदान करित होती. सरोवर आणि नद्यांचे पाणी पावसामुळे गढूळ झाले होते ते निर्मळ झाले होते. रात्रीच्या वेळी देखिल कमळ फुलले होते. वनातील वृक्षवेली भरगच्च रंगीबेरंगी फुलांनी लगडलेल्या होत्या. कुठे पक्षांचा चिवचिवाट होत होता. भुंगे

फुलांवर गुंजारव करित होते. पवित्र आणि शितल वायू फुलांच्या गंधांनी युक्त होवून लोकांना आपल्या स्पर्शाने आनंदित करित मंद-मंद गतीने वाहत होते. असे वाटत होते की जणू सगळीकडे वसंत ऋतुंचे साम्राज्य पसरले आहे. दूर प्रवासाला गेलेल्या पतिचे खूप वर्षांनी आगमन होणार ही बातमी ऐकून पत्नी जशी सुंदर शृंगार करुन त्याच्या येण्याची वाट पाहते तसे पृथ्वी (भूदेवी) ने देखिल आपले पती भगवान श्रीकृष्णांच्या स्वागतासाठी आपल्या सौंदर्याचा विस्तार केला.

ब्राह्मणांच्या अग्निहोत्रांचा न विझणारा अग्नी जो कंसाच्या अत्याचाराने विझला होता तो स्वतः प्रज्वलित झाला. साधुंचे हृदय प्रसन्नतेने फुलून गेले. परमेश्वराच्या प्रगटवेळी देवतांनी दुंदुभी वाजविली. किन्नर आणि गंधर्व मधूर स्वराने गाऊ लागले. सिद्ध आणि चारण परमेश्वराच्या मंगलमय गुणांची स्तुती करु लागले. स्वर्गात अप्सरा नृत्य करु लागल्या. देवता आणि ऋषीमुनी आनंदाने पुष्पांचा वर्षाव करु लागले. जलधर मेघ सागराजवळ जावून मंद-मंद गर्जना करु लागले. अष्टमीचा चंद्रमा पूर्व दिशेला उदित होताना मध्यरात्री अंधकाराच्या साम्राज्यामध्ये पूर्ण चंद्रासमान समस्त अवताराचे अवतारी भगवान श्रीकृष्ण कंसाच्या कारागृहात अवतीर्ण झाले.

ठीक त्याचवेळी श्रीकृष्णाने आपले अनादी काळाचे सिद्ध माता-पिता श्रीनंद आणि यशोदेच्या महालात यशोदा मातेच्या पोटी आपल्या परिपूर्णतम श्रीगोविंद रुपात साधारण बालकाच्या रुपात सूतिकागृहात जन्म घेतला. श्रीकृष्ण जन्माबरोबरच योगमायेने देखिल कन्येच्या रुपात श्रीकृष्णा पाठोपाठ यशोदेच्या पोटी जन्म घेतला. जुळी मुले (यमज) जन्मल्यामुळे प्रसव वेदनेमुळे यशोदा मैय्या शुद्धीवर नव्हती. विशुद्ध वात्सल्य भावाचा उदय अत्यंत प्रगाढ ममतायुक्त भक्तिच्या अधिक्यामुळे होतो. असा विशुद्ध वात्सल्यभाव श्रीनंद आणि यशोदा मातेत आहेच. ते श्रीकृष्णाला आपल्या पुत्राच्या रुपातच पाहतात. त्यांच्या वात्सल्य भावात लेशमात्र देखिल भगवदबुद्धी नाही. याच विशुद्ध वात्सल्य भावाचे आस्वादन

करण्यासाठी श्रीकृष्णांनी आपल्या परिपूर्णतम रुपात नंद बाबा आणि यशोदेच्या पुत्ररुपात जन्म घेतला.

वसुदेवांकडे ते काही कारणांमुळे अवतरित झाले त्याचे मुख्य प्रयोजन आहे असुरांचा संहार. कंसाच्या कारागृहात वसुदेव तसेच देवकीने पाहिले की एक अद्बुत बालक त्यांच्यासमोर आहे. मुखमंडलाची अपूर्व शोभा समस्त लोकांच्या सौंदर्याला पराभूत करित होती. पूर्ण विकसित कमळासारखे विशाल नेत्र, उन्नत नासिका, आणि अधरावर (ओठांवर) मधूर-मधूर मंद हास्य नृत्य करित होते. अवस्था न किशोर, चतुर्भुज रुप, सगळे अंग आभूषणांद्वारे सुशोभित होते. चारी भुजांमध्ये शंख, चक्र, गदा आणि पद्म होते. वक्षःस्थळावर श्रीवत्साचे चिन्ह, तसेच कौस्तुभमणि झळकत होते. भाळावर बहुमूल्य वैदूर्यमणिचा मुकुट शोभत होता. नवजलधरसमान परमसुंदर शामल शरीरावर मनोहर पितांबर झळकत होता. कमरेला झळकणारी करधनी, दंडात बाजुंबद आणि मनगटात कंकण शोभत होते. प्रत्यंगातून अद्भूत छटा झळकत होती. त्यांच्या अंगकांतीने बंदीगृह झळकू लागले. ते दोघे आश्चर्यचकित झाले.

वसुदेवांनी पाहिले की माझ्या पुत्राच्या रुपाने तर स्वयं भगवान् आले आहेत, आणि म्हणून ते आश्चर्यचकित झाले व त्यांचे शरीर आनंदातिशयाने पुलकित झाले. श्रीकृष्णांचा जन्मोत्सव साजरा करण्याकरिता त्यांनी मनोमन ब्राह्मणांना दहा गाई दान करण्याचा संकल्प केला. भगवंतांच्या साक्षात दर्शनाने त्यांच्या मनातील सर्व भय दूर झाले. दोघेही भगवंतांच्या चरणी नतमस्तक झाले तथा ते भगवंताची स्तुती करु लागले.

वसुदेवची म्हणाले- “आपण प्रकृतिच्याही पलिकडले साक्षात पुरुषोत्तम आहात. आपलं स्वरुप केवळ प्रेम आणि आनंद आहे. आपणच सृष्टीचे आदि आहात. आपल्या प्रकृतिद्वारे या त्रिगुणमयी जगताची सृष्टी करतात. परंतु प्रकृतिचे हे तीन गुण आपल्याला स्पर्श करु शकत नाहित कारण आपण सगळ्यांच्या अंतर्यामी आहात, परमसत्य आहात, तसेच

आत्मस्वरुप आहात. हे प्रभो! आपण सर्वशक्तिमान आणि सर्वांचे स्वामी आहात. या समस्त विश्वाच्या रक्षणाकरिता आपण माझ्या घरी अवतार घेतला आहे." देवकी म्हणाली- "प्रभो! शास्त्रांनी आपल्या ज्या रुपाला अव्यक्त, निर्विकार, निर्गुणब्रह्म, ज्योतिःस्वरुप वर्णिले आहे तेच आपलं स्वरुप साक्षात विष्णुरुपाचीच अंगकांती आहे. आपण सर्वशक्तिमान आणि परम कल्याणाचे आश्रय आहात. म्हणूनच मी आपल्याला शरण आली आहे. हे भक्तभयहारी! आम्ही या दुष्ट कंसापासून भयभीत आहोत. तेंव्हा आपण आमचे रक्षण करा. आपण आपले हे अलौकिक रुप साधारण देहाभिमानी व्यक्तिंसमक्ष कृपया प्रकटित करु नका. म्हणून या दिव्य स्वरुपाला आपण लपवून ठेवा. आपण परमपुरुष भगवान आहात आणि माझे गर्भवासी झाले आहात. आपली ही मनुष्यलीला अद्भुतच नाही तर काय?"

आपल्या मात्या-पित्याने केलेली ही स्तुती ऐकून त्यांच्यात वात्सल्य भाव उदित करण्याकरता भगवान म्हणाले- "सायंभुव मन्वंतरात आपण दोघे पृश्नि आणि सुतपा होतात. आपण दोघांनी बारा हजार वर्षे घोर-दुष्कर तप केले. मग मी प्रसन्न होऊन तुम्हांस वर मागायला लावले. तुम्ही माझ्यासारखा पुत्र मागितला. मी म्हटले माझ्यासारखा तर केवळ मीच आहे म्हणून मीच तुमच्या पुत्राच्या रुपात अवतरित होईन त्यावेळी मीच पृश्निगर्भत नावाने तुमचा पुत्र झालो. मग दुसऱ्या जन्मी तुम्ही आदिती आणि कश्यप झालात, त्यावेळीसुद्धा मी उपेंद्र नावाने तुमचा पुत्र होतो. शरीर छोटे असल्याकारणाने लोक मला वामन संबोधू लागले. आता तुमच्या या तिसऱ्या जन्मी सुद्धा मीच तुमचा पुत्र होऊन आलोय. मी तुम्हाला माझं हे स्वरुप याकरिता दाखवतोय की तुम्हाला माझ्या पूर्व अवतारांचे स्मरण व्हावे. केवळ मनुष्य शरीराने माझ्या अवतारांची ओळख होऊ शकत नाही. तुम्ही माझ्याठायी पुत्रभाव ठेवा आणि निरंतर ब्रह्मभाव ठेवा आणि निरंतर ब्रह्मभाव राखा. अशाप्रकारे वात्सल्य-स्नेह तथा चिंतनाद्वारे तुम्हांस माझ्या परमपदाची प्राप्ती होईल."

“सद्यो बभूव प्राकृतः शिशुः।” (श्रीम. भा. 10/3/46) भगवंताने आपल्या योगमायेच्या प्रभावाने पाहता-पाहता एका साधारण शिशुचे रुप धारण केले आणि वसुदेवजींना सांगितले की मला गोकुळात नंदमहारांच्या भवनी नेऊन, यशोदेच्या नवजात कन्येला इथे घेऊन यावे.

श्रीकृष्ण मथुरेत कंसाच्या कारागृहात चतुर्भुज वासुदेव रुपात प्रकटित झाले कारण वसुदेव तथा देवकीच्या हृदयात श्रीकृष्णाचे जे चतुर्भुज रुप स्फुरित झाले तेच रुप बाहेरही अविर्भुत झाले. श्रीवसुदेव- देवकीचा वात्सल्य भाव ऐश्वर्य मिश्रित असल्याकारणाने शिथिल आहे.

तेंव्हा वसुदेवजींनी भगवंतांच्या प्रेरणेने आपल्या पुत्राच्या रक्षणाकरिता त्याला कारागृहाबाहेर नेण्याची इच्छा व्यक्त केली. यद्यपि वसुदेवजींनी कंसाला वचन दिले होते की मी आपल्या पुत्रांना तुझ्या स्वाधीन करीन, परंतु श्रीकृष्णाची आज्ञा ऐकून त्यांनी आपल्या वचनाचा भंग केला. इथे असा प्रश्न उद्भवू शकतो की धर्मात्मा वस  देवजींनी धर्माचे उल्लंघन करु पाप का केले? मन्निमितंकृतं पापमपि धर्माय परिकल्पते! (महाभारत) अर्थात श्रीकृष्णाकरिता केलेले पाप देखिल धर्म आहे. श्रीकृष्णाच्या आदेशांचे पालन करणे म्हणजेच यथार्थ धर्म होय.

त्याच दरम्यान योगमायेने द्वारपालांना आणि पूरवासियांना गंभीर निद्रेत अचेत केले. मजबूत बेड्या तथा कारागृहातील सगळी कुलुपे आपोआप उघडली गेली. वसुदेवजी श्रीकृष्णाला कवेत घेऊन बाहेर आले. बाहेर घनघोर वर्षा होत होती. घनघोर बरसणाऱ्या पावसापासून वसुदेव आणि श्रीकृष्णाचे रक्षण करण्याकरिता बलदेव प्रभुंनी आपल्या अनंतदेव विराट रुपात तथा सहस्त्र फण्यांनी त्यांना झाकून टाकले. ते अलक्षित रुपाने वसुदेवजींच्या मागोमाग चालू लागले. गोकुळी जाण्याकरिता ते यमुनेच्या तीरी येऊन पोहोचले. घनघोर वृष्टीमुळे यमुनेचा जलस्तर वाढला होता, आणि तिचे पात्र खोल होऊन प्रवाहाने प्रचंड गती धारण केली होती. फेसाळलेल्या लाटांमुळे यमुनेच्या पात्रात ठिकठिकाणी भोवरे निर्माण झाले होते. त्या जन्मजात बालकाला घेऊन नदीचे असे पात्र पार करुन जाणे

अशक्यप्रायच होते. वसुदेवजी मनोमन विचार करु लागले- “आता काय करु?”, त्याचवेळी योगमाया देवी एका श्रृगालाच्या रुपात दुविधेत सापडलेल्या वसुदेवजींच्या समोरुन यमुना पार करु लागली. ते पाहून त्यांनी विचार केला, अरे! पाणी इतके खोल नाही. जर श्रृगाल पात्र करुन जाऊ शकते तर मी का नाही? वसुदेवजी जेंव्हा पाण्यात उतरले, पाण्याचा स्तर वाढून ते अधिक खोल होवू लागले, कारण यमुनाजी आपल्या प्रभूचे चरण स्पर्श करु पाहत होती. जेंव्हा वसुदेवजी पाण्यात बुडू लागले तेंव्हा श्रीकृष्णाने विचार केला- माझ्या वडिलांना फारच त्रास होत आहे. म्हणून मग त्यांनी आपले चरण उचलून यमुनेच्या पात्रात सोडले आणि यमुनेला आपल्या पावलांचा स्पर्श होऊ दिला. यमुना संतुष्ट झाली व जलस्तर कमी झाला आण तिने वसुदेवजींना मार्ग करुन दिला. वसुदेवजी गोकुळात येऊन पोहोचले. श्रीकृष्णांच्या इच्छेने नंदजींच्या घरापासून गोकुळापर्यंत सगळी स्थाने येण्याजाण्याच्या सुविधेने परिपूर्ण झाली. नंदभवनातील सगळेच गृहवासी अचेत निद्रेत निमग्न होते. सूतिका गृहात यशोदेच्या मागे पहुडलेल्या यशोदानंदनाला वसुदेवजींनी पाहिलेच नाही. त्यांनी सम्यक रुपात वाढलेल्या मोहाला त्यागून ठेवीच्या रुपात ठेवलेल्या रत्नासमान श्रीकृष्णाला यशोदेच्या मागे सोपविले, तत्क्षणी वसुदेवनंदन पहुडलेल्या यशोदानंदनात वेगाने आत्मसात् झाले. हे सगळे कार्य इतक्या शीघ्रतेने झाले की वसुदेवजींना काहीच समजले नाही. त्यांनी नवजात कन्येला (योगमाया) उचलले आणि मथुरेकडे परतले. जेंव्हा श्रीयशोदानंदन श्रीवसुदेवनंदनात एकाकार होऊन नंदनंदन स्वरुपात एकाकार झाले तेंव्हा शंख, चक्र, गदा, पद्मादि, भगवदावतार प्रकाशक चिन्हे श्रीनंदनंदनाच्या करांवर तसेच चरणांवर चिन्ह रुपात स्थित झाली. कौस्तुभमणि, बंशी, वनमाला आदी सगळे श्रीकृष्णाबरोबर अवतीर्ण झाले परंतु भगवद्सेवेकरिता योग्य वेळेची प्रतिक्षा करित अलक्षित रुपाने प्रभुच्या आसपास स्थित होते.

वसुदेवजी जेंव्हा मथुरेत कंसाच्या बंदिगृहात कन्येला घेऊन परतले, तेंव्हा नगराचे आणि कारागृहाचे सर्व दरवाजे आपोआप बंद झाले आणि त्यांच्या हातापायांतल्या बेड्या पूर्ववत् बांधल्या गेल्या. नवजात शिशुच्या रडण्याचा आवाज ऐकून पहारा देणाऱ्यांची निद्रा भंग पावली आणि त्यांनी त्वरित जाऊन कंसाला याची सूचना दिली. तो भराभर बंदिगृहाकडे आला. देवकीने रडता-रडता कंसाला आपल्या कन्येस सोडून देण्याची विनंतीपूर्वक प्रार्थना केली. परंतु त्या दुष्टाने त्या नवजात बालिकेच्या पायाला धरुन तिला शिळेवर आपटले. त्याच्या हातातून निसटून कंसाच्या डोक्यावर लथ्थाप्रहार करित ती कन्या आकाशी गेली आणि तिने अष्टभुजा देवी, महामायेचे रुप धारण केले. ती देवी कंसास म्हणाली, “अरे मूर्खा! मला मारुन तुला काय मिळणार, तुला मारणारा तर दुसऱ्या ठिकाणी जन्माला सुद्धा आलाय.” देवीचे हे बोल ऐकून कंसाला असीम आश्चर्य झाले. त्याने तत्क्षणी देवकी आणि वसुदेवास कारागृहातून मुक्त केले. जोपर्यंत ती कन्या वसुदेवजींच्या सोबत होती तोपर्यंत ती योगमाया होती, कंसाच्या हातून गेल्याबरोबर ती महामाया बनली. योगमाया जीवांना श्रीकृष्णसेवेत नियुक्त करते, परंतु महामाया श्रीकृष्ण विमुख जीवांना दंड प्रदान करते.

## श्रीनंदनंदन रहस्य

श्रीकृष्ण ब्रजधामी मधूर लीलांचा प्रकाश करतात, तथा ते ब्रजधामी आपल्या परिपूर्णतम स्वरुपात विराजमान आहेत, जन्माच्या समयापासून त्यांच्या ऐश्वर्यलीला पाहता येऊ शकतात. ते एकाचवेळी गोकुळात यशोदानंदनाच्या रुपात जन्म घेतात तसेच मथुरेत कंसाच्या कारागृहात वसुदेव-देवकीच्यासमोर चतुर्बुज रुपात प्रकटित होतात. ते दोघोही भगवंताला सन्मुख पाहून आश्चर्यचकित झाले तथा स्तवन-स्तुती करु लागले. भगवान श्रीकृष्णांनी पुन्हा शिशुरुप धारण केले कारण त्यांना

वसुदेव-देवकीच्या हृदयात वात्सल्यभाव जागृत करायचा होता. ते वसुदेवजींना म्हणाले की मला गोकुळात घेऊन चला.
आपले आचार्यगण नंदनंदन रहस्याविषयी तीन प्रकारचे विचार प्रस्तुत करतात-

प्रथम विचारः- श्रीकृष्णाच्या अपूर्व द्विभुज शिशु रुपाने आधीच योगमायेसहित यशोदेच्या पोटी जन्म ग्रहण केला होता. तेज द्विभुज रुप देवकीच्या शय्येवर प्रकट झाले तथा चतुर्भुज रुपाला स्वतःमध्ये अंतर्भुक्त केले. वसुदेवजी श्री नंदनंदनालाच गोकुळी घेऊन आले तथा यशोदेजवळ त्याला झोपवून कन्येला घेऊन मथुरेस परतले.

दुसरा विचारः- जेंव्हा वसुदेवजी बाळकृष्णाला घेऊन चालले होते तेंव्हा त्यांच्या मार्गात दुथडी भरुन वाहणाऱ्या यमुनेच्या मध्यप्रवाहातून ब्रजधामी जातांना देवकीनंदन यशोदानंदनात आत्मसात् झाले. परंतु वसुदेवजी काहीसुद्धा समजू शकले नाहित.

तिसरा विचारः- काही काही कल्पांमध्ये जेंव्हा वसुदेवजी गोकुळात नंदभवनात बाळाला हातात घेऊन पोहोचतात तेंव्हा यशोदेच्या मागे पहुडलेले बाळ देवकीनंदनाला अतिशय शीघ्रतेने आत्मसात् करुन घेते. इतके की यशोदामाई आणि वसुदेवजी हे रहस्य जाणू शकले नाहित.

आता प्रश्न असा उद्भवतो की जेंव्हा वसुदेवजी बाळकृष्णाला घेऊन गोकुळातल्या नंदभवनी पोहोचले तेंव्हा त्यांनी यशोदेचा पुत्र पाहिला नाही, केवळ कन्येलाच पाहिले. गोकुळातल्या नंदभवनी दोन्ही बाळे एकमेकांत इतक्या शीघ्रपणे आत्मसात् झाली की वसुदेवजी काही समजुच शकले नाहित. तथा योगमायेच्या प्रभावामुळे मुर्छितप्राय यशोदाजी देखिल हे रहस्य जाणू शकल्या नाहित.
वेगवेगळ्या कल्पांतर्गत अशा वेगवेगळ्या परिस्थिती योगमायेद्वारा संपादित होतात. “कल्पभेद हरि कथा सुहावा।।” सारांश हाच की यशोदेच्या सुतिकागृहाला सुशोभित करणारा त्यांचा गर्भजात पुत्र कन्हैयाच आहे तसेच त्याचेच लालन-पालन करतांना वात्सल्य रसाच्या चरम अवस्थेचं

आस्वादन यशोदाजी करितात. श्रीमद्भागवतातवर्णिल्याप्रमाणे श्रीकृष्ण नंदबाबांचेच आत्मज आहेत- नंदस्त्वात्मज उत्पन्ने जाताल्हादो महामनः। (श्रीमभा.10/5/1) श्रीकृष्णाचे परिपूर्णस्वरुप ब्रजधामी, पूर्णतर मथुरेत तर पूर्ण स्वरुप द्वारकेत विराजित आहे. श्रीकृष्ण तर एकच आहेत परंतु त्यांच्या पूर्ण, पूर्णतर आणि पूर्णतम स्वरुपाचा प्रकाश त्या स्थानातील परिकरांच्या सेवावृत्तीनुसार ठरते. तत्वतः तिन्ही रुपे एकच आहेत. केवळ अभिमानमात्र अथवा भावनांचे अंतर असते. “मी नंदपुत्र आहे” असा अभिमान झाल्यावर गोपवेश, गोपाभिमान असतो आणि नंदनंदन असल्याचा अभिमान स्वाभाविक होतो. “मी नंद-यशोदेचा पुत्र, सखांचाही सखा तसेच गोपींचा प्राणवल्लभ आहे” ही भावना आल्यानंतर त्यांचे बासरी, मोरमुकुट, सुसज्जित गोपवेश असे स्वरुप असते.
वसुदेवपुत्र असल्याचा अभिमान असल्यानंतर मात्र गोपवेश रहात नाही, क्षत्रियवेश क्षत्रिय भावना होऊन जातात, त्यामुळे तेंव्हा ते यदुवंशी वीर होतात. चारी बाजूंना हत्ती, घोडे, रथध्वनी इ. असतात. समस्त परिकरवृंद श्रीकृष्णाला राजराजेश्वर द्वारकाधीश रुपात ओळखतात. श्रीकृष्ण एकच आहेत परंतु भावना पृथक्-पृथक् आहेत.

## गोकुळांत श्रीकृष्ण जन्मोत्सव

योगमाया निघून गेल्यानंतर यशोदाजींची बेशुद्धावस्था जेंव्हा दूर झाली तेंव्हा त्यांनी आपल्या नुकत्याच जन्मलेल्या पुत्राचे प्रथम दर्शन घेतले. नीलोत्पल दलासमान श्यामवर्ण देह, पूर्णचंद्राच्या शोभेलाही पराभूत करणारे मुखमंडळ, कमळासारखे नेत्र, कल्पवृक्षाच्या कोवळ्या पालवीलाही लज्जित करणारे कर तथा चरण, हे असे परमसुंदर रुपडे पाहून त्यांच्या हृदयात आनंदसागरलहरी उसळू लागल्या. आपले छोटे-छोटे नाजुक हातपाय हलवित त्या नवजात बाळाचे अत्यंत मधूर रुदन यशोदेच्या कर्णपुटांमध्ये अमृतसिंचन करित होते. अशा परमसुंदर पुत्राचे दर्शन करताच यशोदाची विचार करु लागल्या, “हे बालक श्यामवर्ण कांतिचे साम्राज्य आहे, की

नानाविध रुपांचा सागर आहे, की लावण्याचे साक्षात् स्वरुप आहे की माझ्या अंगांचेच परिपक्व फलस्वरुप आहे?" नवजात बालकाचे दर्शन करताच यशोदाराणीच्या शरिरात स्तंभ, अश्रू, पुलकादी, अष्ट सात्विक विकार प्रकट झाले. त्या आपल्या सखींनादेखिल बोलाविण्यास असमर्थ होत्या. या पुत्राच्या लालनपालनाच्या लालसेने त्यांचा आत्मादेखिल व्याकुळ झाला. त्याचवेळी बाळाचे रडणे ऐकून अन्यान्य गोपीसुद्धा धावत आल्या आणि त्या परमसुंदर बालकाचे दर्शन घेत म्हणाल्या- "ही काय नूतन नीळकमळांची माळा आहे की महान इंद्रनीलमणि आहे? अहाहा! या बालकाने तर आमच्या देहाचा समस्त व्यापार स्थगित करुन केवळ नेत्रांनाच आपल्याकडे आकर्षित केलंय!" त्यांनी पाहिले की बाळाचे शरीर अतिकोमल आहे त्याचे पूर्ण चंद्रासमान मुख काळ्या अलकावलीने सुशोभित आहे. दोन्ही हातांच्या मुठी बंद आहेत आणि यमुनेच्या मृदु तरंगांप्रमाणे ते बालक करकमलांच्या तथा चरणकमलांच्या मंद हालचाली करित आहे. माता यशोदा आनंदातिशयाने आपल्या पुत्राला सारखे सारखे पाहूनसुद्धा तृप्त पावत नव्हती. त्यांच्या स्तनयुगुलांतून दुग्धधारा तथा नेत्रांतून अश्रुधारा प्रवाहित होत होत्या. रोहिणीदेवींना असे झाले होते की कधी एकदाची पुत्रजन्माची गोड बातमी नंदराजजींना देतेय. त्यांनी एका वृद्ध ब्राह्मणीला गोठ्यात पाठविले. पुत्रजन्माला शुभसमाचार अतिशीघ्र नंदराजजींपर्यंत पोहोचविण्याच्या लालसेने त्यांना जवळचे अंतरदेखिल खूप लांबचे वाटू लागले. हातातल्या फळे-पुष्पादि मांगलिक वस्तू घेऊन ती धावतपळतच तिथे पोहोचली. नंद महाराज- उपनंद आदि आपल्या भावांसोबत गोदोहनाकरिता गोठ्यात बसले होते. अत्याधिक आनंदामुळे ब्राह्मणीच्या मुखांतून शब्दच फुटत नव्हते. परंतु तिच्या मुखावरील हर्षयुक्त भावांनी तिथल्या गोपांना नंदबाबांच्या पुत्रजन्माची जणू सूचनाच देऊन टाकली. कसातरी प्रयत्न करित ब्राह्मणी नंदबाबांना म्हणाली- "आपल्या पुत्रासहित आपले मंगल होवो!" अशा अपूर्व सुखपूर्वक वचनांसहित हळद-कुंकू आणि चंदनाने लिप्त दुर्वांकूर, श्रीफळ आदि

मंगलमय फळे तिने श्रीब्रजराजजींच्या मंगल करांत अर्पण केली. नंदमहारांचे समस्त अंग रोमांचित झाले तथा ते आनंदसागरात निमग्न झाले, परंतु काही बोलू मात्र शकले नाहित. नंदबाबांच्या पुत्र जन्माची शुभवार्ता ऐकताच सगळे गोपगण आनंदाने ओरडू लागले. तत्क्षणीच आनंदजींनी आदेश दिला- "आता इथे गोदोहनाकरिता जितक्या गाई एकत्रित केलेल्या आहेत त्या सगळ्या गाई या ब्राह्मणीच्या स्वामीकडे पोहोचविण्याची व्यवस्था करण्यात  यावी." तेथे बसलेल्या अन्य गोपांनी आनंदवर्गयुक्त होऊन म्हटले- "आणखी जे काही या ब्राह्मणीला हवे आहे ते सर्व तिला देण्यात यावे."

तदनंतर नंद महाराजांनी असंख्य गाई दान करण्याचा संकल्प केला आणि उपनंद आदि गोपांसमवेत सुंदर वेश धारण करुन ते घराकडे गेले. श्रीरोहिणीजींच्या आदेशानुसार महापुराच्या द्वारी ढोल-नगारे-चौघडे वाजण्यासी सुरुवात झाली होती. ती दुंदुभिवाद्ये जणू गात होती, "नंदाघरी आनंद झाला, नंदाघरी आनंद झाला." अत्यंत हर्षामुळे श्रीब्रजराज एकसारखे स्तंभवत् होत होते. कसेतरी ते आपल्या भवनापर्यंत पोहोचले आणि अंतःपुरातील पूर्ण कुंभ तथा अन्य मांगलिक द्रव्यांनी सुसज्जित सूतिकागृहात त्यांनी प्रवेश केला. नंदमहाराजांच्या आगमनाची सूचना मिळताच रोहिणीजींनी नवजात शिशुला सुंदर वस्त्रात झाकले आणि त्या सूतिगृहाच्या उंबरठ्यापर्यंत त्याला घेऊन आल्या. तेथे नंदबाबांनी आपल्या पुत्राने अवलोकन केले. त्या परमानंदाचे बीज असलेल्या आपल्या पुत्राचे दर्शन करिताच नंदबाबा सकलमनोरथयुक्त झाले. श्रीनंद महाराजांनी पाहिले की त्यांचा पुत्र तर समग्र सौंदर्याचा जणू निधीच आहे. अतिशय दैदिप्यमान कांतीने युक्त अशा या बालकाच्या शोभेला काही अंतच नव्हता.

दर्शनानंदाने ते जडवत् निश्चल झाले. उपनंदाच्या पत्नीने बाळाला त्यांच्या हाती सोपविले. त्यावेळी नंदबाबांचे शरीर या विशाल सुखामुळे पुलकित झाले आणि आनंदाश्रुंनी भिजून चिंब झाले.

त्यानंतर वेदज्ञ ब्राह्मणांना बोलावून त्यांनी स्वस्तिवचन आणि आपल्या पुत्राचा जातकर्म-संस्कार करविला. त्यावेळी नंदबाबांनी आपल्या पुत्राच्या मंगलकामनेकरिता ब्राह्मणांना प्रचूर दान देण्यास सुरुवात केली. स्वर्णाने मढवलेली शिंग असलेल्या चांदीने मढवलेली खुरे असलेल्या, मणिमय माळांनी सुशोभित अशा असंख्य गाई त्यांनी दान केल्या. नंतर चार-चार मण तिळांचे सात पर्वत बनवून ते दान केले. ते तिळाचे पर्वत सोन्याने आणि रत्नांनी आविष्टित होते. नंदबाबांनी नंदोत्सवात दिलेल्या दानाचे काही मोजमापच नव्हते.

त्यावेळेस नंदभवनात ब्राह्मण, सूत, मागध आणि वंदीजन मंगलम आशीर्वाद देत स्तुती करु लागले. गायक अभिनंदनपर मंगलगीतांचे गायन करु लागले. सनई, चौघडे, नगारे, ढोल, तारो, दुंदुभी ही सगळी वाद्ये वाजू लागली. समस्त व्रजवासियांनी आपापल्या घरांना, दारांना, अंगणांना, भिंतींना, स्वच्छ करुन, लिंपून, सुगंधी पाण्याचा शिडकावा केला आणि चित्र-विचित्र ध्वजा, पताका, फुलांच्या माळा, रंगीबेरंगी वस्त्र आणि नव पल्लवांनी युक्त तोरणांनी सजविले. गोपांनी गाय, बैल आणि वासरांना हळद तथा तेलाच्या लेपाने रंगविले. त्यांना विचित्र रंगित धातुंनी, मोरपंखांनी, फुलांच्या माळांनी, वेगवेगळ्या प्रकारच्या सुंदर वस्त्रांनी, तसेच सोन्याच्या साखळ्यांनी सजविले. सगळे गोपगण सुंदर वस्त्र, आभूषण, अंगरखे आणि पगड्या घालून नटून थटून बऱ्याचशा भेटवस्तू घेऊन नंदभवनी येऊ लागले.

यशोदेला पुत्र झालाय हे ऐकून गोपींनादेखिल खूप आनंद झाला. त्यांनी सुंदर-सुंदर वस्त्र धारण केले, कानात मणिमय कुंडल, गळ्यात रत्नजडित सोन्याचे हार, हातात जडाऊ बांगड्या, कमरेला कंबरपट्टे, पायात पैंजण, डोळ्यांत काजळ तसेच कपाळाला कुंकू लावून साजश्रृंगार केला. त्यांचे पयोधर आणि नितंब मोठे तर कंबर नाजुक होती. हातांत भेटवस्तू घेऊन त्या लगबगीने यशोदेकडे पोहोचल्या. घाईघाईने चालल्याने त्यांच्या कानांतली कुंडले, पयोधर आणि हार हलत होते तथा मार्गांत केसांत

माळलेली फुले बरसत होती. अशाप्रकारे नंदभवनी जातांना त्यांची अपूर्व शोभा दिसत होती. नंदभवनात पोहोचल्यावर सगळ्यांनी यशोदेच्या नवजात बाळाला अनेकानेक शुभ आशीर्वाद दिले. “यशोदे, तुझा पुत्र चिरंजीवी होवो, देवा! त्याचे रक्षण कर.” हळद आणि तेलाने मिश्रित जल सगळ्यांवर शिंपडित उच्चस्वरात मंगलगायने करित त्या नृत्य करु लागल्या. विचित्र वस्त्रांनी सुसज्जित त्या गोपींच्या कंबरपट्ट्यांतील नुपूर आणि पायातील समुधूर ध्वनीने वातावरण संगीतमय झाले.

श्रीउपनंद आणि गोपगण गंभीर प्रकृतिचे असूनही चंचल व्यक्तिंप्रमाणे तेही नृत्य-गायन करु लागले. आनंदाने मस्त होऊन गोपगण एकमेकांवर दही, दूध, तूप आणि जल उडवू लागले. एक दुसऱ्यांच्या तोंडाला लोणी माखू लागले आणि लोणी उडवून आनंदोत्सव साजरा करु लागले. सगळ्या गोपगणांनी दूध, दही उडविल्यामुळे ते स्थान शुभ्रवर्ण क्षीरसागरासमान दिसू लागले. नंदबाबा मनस्वी आणि उदार होते. त्यांनी गोपांना खूप वस्त्र, आभूषणे आणि गाई भेट म्हणून दिल्या. सूत-मागध-वंदीजन-नृत्य-वाद्य आदि विद्येद्वाश आपले पोट भरणारे कलाकार- इतर गुणीजन, विद्वान, पंडित, या सगळ्यांना नंदबाबांनी त्यांना हवे असेल ते देऊन त्यांचा यथोचित सत्कार केला. हे सगळे विधी करण्यामागचा त्यांचा हेतू हाच होता की त्यामुळे भगवान नारायण प्रसन्न होवोत आणि माझ्या या नवजात बाळाला मंगल आशीर्वाद देवोत. श्रीकृष्णाच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने नंदबाबांनी जितके दान केले ते कुबेराकरिताही अशक्यप्राय होते.

ब्रजभूमी श्रीकृष्णाच्या अविर्भावामुळे त्या दिवसापासूनच प्रचूर समृद्धी शालिनी झाली तसेच लाखो गोपी रुप लक्ष्मींनी, शोभा संपत्तीयुक्त होऊन, शोभा संपत्तीयुक्त होऊन विलक्षण चमत्कारमयी झाली.

ततआरभ्य नंदस्यव्रजः सर्वसमृद्धिमान्।
हरेर्निवासात्मगुणै रमाक्रीडमभूनृप।। (श्रीम भा. 10/5/18)

श्रीशुकदेवजी म्हणाले- हे राजन् परिक्षित! श्रीकृष्णाच्या जन्मसमयापासूनच

ही श्रीनंदजींची व्रजभूमी समस्त समृद्धिंनी युक्त झाली आणि श्रीहरिंचे निवासस्थान असल्याकारणाने, आपल्या गुणांच्या योगे श्रीलक्ष्मी देवींचीही क्रीडाभूमी ठरली.

नंदमहोत्सव खूपवेळपर्यंत चालला. समस्त गोकुळ आनंदात निमग्न झाले होते. नंतर समस्त गोपांनी सुगंधी गोपांनी सुगंधी तेलांनी मर्दन करुन स्नान केले आणि दिव्य वस्त्र धारण करुन कर्पूरचंदनादि तिलक मस्तकी लावले. मग सगळेजण पौर्णमासीदेवी पर्णशाळेत आले आणि त्यांना प्रणाम केला.

पौर्णमासीदेवींकडून आशीर्वाद घेऊन वंदीजनांचे ख्यातिपूर्ण यशोगान ऐकून समस्त व्रजवासी राजभवनी पोहोचले. त्यानंतर रोहिणीदेवींनी सगळ्याव्रजवासींनी भोजनाकरिता निमंत्रण दिले आणि सगळ्यांना आनंदपूर्वक सगळी रात्र नृत्य-गीत-हास-परिहास करित जागरण केले. श्रीकृष्णांनी जन्म ग्रहण केल्यामुळे रोहिणीजींना किती सुख प्राप्त झाले याचे वर्णन कोण बरे करु शकेल? त्यांचे पति कंसाच्या कारागृहात बंदी आहेत आणि त्यांच्यापासून दूर परदेशी आहेत तरिसुद्धा त्यांनी या महोत्सवात नानाविध वेषरचना केली. श्रीकृष्ण जन्मोत्सवाच्या अत्याधिक आनंदात त्या प्राचीन प्रथासुद्धा विसरुन गेल्या.

## पूतना उद्धार लीला

श्रीनंदोत्सवाच्या दिवशीच श्रीवसुदेवांचा एक दूत गुप्त रुपाने नंद म हाराजांकडे आला. नंद महाराजांनी श्रीवसुदेवांचा समाचार विचारला असता तो आश्चर्यमिश्रित वाणीने म्हणाला की काल रात्री श्रीदेवकीजींनी कुण्या एका कन्येला जन्म दिला. कंसाने जेंव्हा त्या कन्येला शीळेवर आपटून मारण्याचा प्रयत्न केला तेंव्हा त्या कन्येचे एक अस्त्रधारी अष्टभुजा देवीचे रुप धारण

केले आणि ती आकाशी उडाली. जाता जाता कंसाचा उपहास करित म्हणाली, “अरे मूर्ख कंसा! मला मारुन तुला काय मिळणार? जो तुझा पूर्व शत्रू आणि विनाशक आहे तो अन्यत्र जन्माला सुद्धा आला आहे. म्हणून आता तु निरर्थपणे निर्दोष शिशुंची हत्या करु नकोस.” असे म्हणताच ती देवी अंतर्धान पावली. त्या देवीचे ते वचन ऐकल्यानंतर कंसाने श्री देवकी आणि श्रीवसुदेवजींना बंधनमुक्त केले, तसेच पूर्वकृत्य अत्याचारांची क्षमा मागितली. कंस म्हणाला, “हाय हाय! केवळ मनुष्यच मिथ्यावचन नाही बोलत तर देवता सुद्धा खोटे बोलू लागल्यात. म्या पापात्म्याने त्या देववाणी विश्वास आपल्या बहिणीच्या पुत्रांचा वध केला.” तत्पश्चात कंसाने त्यांना कारागृहातून मुक्त केले.

परंतु माझ्या स्वामींना कंसावर जराही विश्वास नाही. कारण सकाळीच त्या कुलांगार कंसाने आपल्या प्रिय दैत्यांना मंत्रणेकरिता बोलवून त्यांना रात्रीचा सर्व वृत्तांत सांगितला. दृष्ट मंत्र्यांनी चाटुकारिता करित कंसाच्या शौर्याची प्रशंसा केली. ते म्हणाले, “आपल्या बळ-प्रतापाने तर समस्त देवता थर-थर कापतात. म्हणून तर आपल्याला त्यांच्यापासून कुठलेच भय नाही. शिवजींपासूनही घाबरायचे कारण नाही कारण ते तर वनांत विचरण करित आहेत आणि ब्रह्माजी तर तपस्येत रत आहेत. विष्णुजी सगळ्यांच्या अंतःकरणात वास करतात. आपल्याला घाबरायचे काही कारण नाही हे जरी खरे असले तरी शत्रुची उपेक्षाही कधी करु नये. म्हणून आम्ही सगळ्या नगरातील, ग्रामातील तथा जनपदातील दहा दिवस किंवा दहा दिवसांपेक्षा कमी वय असलेल्या सगळ्या नवजात शिशुंचा वध करु. देवता सदा-सर्वदा आपल्या रक्षेकरिता विष्णुच्या शरणी जातात. जिथे वेदांद्वारा अनुमोदित सनातन धर्मचा वास आहे, श्री विष्णू तेथेच विद्यमान असतात. वेद, गाय, ब्राह्मण तथा दक्षिणायुक्त यज्ञ सनातन धर्माचे मूळ आहेत आणि हे सगळे विष्णुचे शरीर आहे. सर्वांतर्यामी विष्णू दैत्यांचे शत्रू तसेच देवतांचे प्रधान नायक आहेत. म्हणूनच संपूर्ण रुपाने वेदज्ञ ब्राह्मणांचा याज्ञिक तपस्वींचा तथा यज्ञात हवि प्रदान करणाऱ्या गाईंचा

विनाश करणे हाच विष्णुच्या वधाचा उपाय आहे." मंत्र्यांच्या अशा प्रकारच्या कुमंत्रणेला दुर्मती कंसाने अनुमोदन दिले. स्वेच्छामय रुप धारण करणाऱ्या दानवांना त्याने सर्वत्र गो-ब्राह्मणाची हिंसा करण्याकरिता पाठविले.

या अहितकर वचनांना ऐकून क्रोधयुक्त कंसाला घाबरुन नंदमहाराज म्हणाले- "श्रीमान् भ्राता वसुदेवजींनी माझ्याकरिता काही शुभसंदेश पाठविला आहे काय?"

दूत म्हणाला- "होय, त्यांनी सांगितले आहे की आपण राजवेशात राक्षसरुप धारण केलेल्या कंसाला वार्षिक कर दिल्यानंतर मला एकांतात येऊन भेटा आणि हा संदेशही धाडला आहे की आपल्या पुत्रजन्माच्या मंगलमय बातमीने आम्हीही आनंद पावलो आहोत. तथा आपल्या पुत्रासमान त्या रोहिणीनंदनाविषयीही आम्हाला सूचना द्या."

श्री नंदमहारांनी दूताच्या भोजनाची तथा रात्रीच्या विश्रामाची व्यवस्था केली. त्यांनी आपल्या बांधवांसमवेत या विषयावर चर्चा केली आणि हा निष्कर्ष काढला की वसुदेवजींचा संदेश समयानुकूल आहे तेंव्हा लवकरात लवकर कंसाला कर देऊन राजारुप त्या विषधराचे तोंड बंद करणेच योग्य आहे.

तदनंतर श्रीनंदमहारांनी प्रातःकाळी त्या दूताला आदेश दिला की- "हे सौम्य! तु पुढे जा! त्यांच्या बालकाच्या संपूर्ण मंगलयुक्त गोष्टी तसेच त्या वसुदेवजींना वांछित अन्य आनंददायक वृत्तांत विस्तारपूर्वक सांग. आम्हीसुद्धा वसुदेव दादांच्या आज्ञेनुसार राजासाठी कर एकत्र करुन निःसंदेह पाच दिवसांनंतर येत आहोत."

त्यानंतर गोकुळराज श्रीनंदजींनी मथुरेला जाण्याची तयारी केली तथा आपला मोठा भाऊ आदिंना बाळकृष्णाच्या देखरेखीकरिता नियुक्त करुन जाता जाता मनात विचार केला की - "शत्रू आणि मित्राविषयी समान भाव असूनही माझे अंतःकरण या नवजात शिशुकरिता इतके आसक्त होत आहे. यावेळेस मी दुष्टाकडे चाललो आहे, काय होईल सांगता येत नाही, म्हणून मग व्याकुळता दूर करण्याकरिता या बालकाला वारंवार डोळ्यांत साठवूनच मथुरेला जातो."

नंदबाबांची धनसंपत्तीमध्ये कुठल्याही प्रकारची आसक्ती नव्हती, ते विरक्त साधू पुरुष होते, परंतु प्रौढावस्थेत पुत्र प्राप्ती झाल्याकारणाने त्याच्या लालन पालनाच्या इच्छेने-लालसेने, त्यांच्यात धन-संपत्ती आणि आपला पुत्र श्रीकृष्ण यांत अत्याधिक आसक्ती उत्पन्न झाली. अशाच प्रकारे भजनातसुद्धा आसक्ती होणे आवश्यक आहे. “श्रीकृष्ण माझे आहेत” “मी श्रीकृष्णांची आहे” अशी भावना असावी लागते. जर श्रीकृष्णांशी संबंध नाही तर भजनात प्रवेश होणे अशक्यप्राय असते.

नंतर निघतांना नंदबाबांनी आपल्या मांडीवर असलेल्या बालमुकुंदाच्या मुखारविंदाकडे पुन्हा पुन्हा पाहिले आणि चिरस्थायी हर्ष प्राप्त केला. ललाटापासून हनुवटीपर्यंत यथेष्ट चुंबन केले. बाळाला पुन्हा पुन्हा आलिंगन दिले, तरिससुद्धा तृप्ती होत नव्हती. वारंवार त्याला पाहण्याची इच्छा होतच होती. आपल्या पुत्राचा थोड्या वेळाकरिता सुद्धा वियोग त्यांना असहनीय वाटत होता. परंतु कसेतरी धैर्य धारण करित त्यांनी विचार केला की कंसाला योग्य वेळी कर देणं तथा त्याचा सन्मान करणे आवश्यक आहे. अन्यथा तो कुपित होऊन यशोदेला आणि मला कारागृहात बंदी बनवून टाकेल. तसेच माझ्या पुत्राचे अनिष्ट करेल. असा विचार करुन ते आणखीनच व्याकूळ झाले. काही वेळानंतर चित्त स्थिर झाल्यावर त्यांनी पुन्हा विचार केला की माझे मथुरेला जाणे माझ्या पुत्राच्या मंगलाकरिताच आहे. तेंव्हा नंदबाबांनी मथुरेकडे प्रस्थान केले.

मथुरेला पोहोचल्यावर, कोषाध्यक्ष आदी कर्मचाऱ्यांना कर देऊन श्रीनंद महाराज श्रीवसुदेवजींच्या घरी न जाता आपल्या मुक्कामीच परतले जेणेकरुन कंसाच्या मनात कसल्याही प्रकारची शंका उत्पन्न होऊ नये. मुक्कामी आल्यानंतर ते चिंतनच करित होते की कशाप्रकारे वसुदेवजींना एकांतात भेटता येईल, तेवढ्यात श्री वसुदेवजी स्वतःच केवळ एका विशेष सेवकासहित तिथे पोहोचले. नंदबाबांनी अचानक आलेल्या आपल्या छोट्या भावाला, वसुदेवजींना आनंदित होऊन अनुरागपूर्वक मिठी मारली तथा वसुदेवजींनी सुद्धा त्यांना आलिंगन दिले. परंतु कुणीच कुणाला प्रणाममात्र केला नाही.

कारण, वसुदेवजी क्षत्रिय असल्यामुळे जातीने श्रेष्ठ होते, तर नंदबाबा वयाने ज्येष्ठ होते. परस्पर प्रणाम न करण्याचे हे एवढेच एक कारण नव्हते, तर परस्परांवरचे निरतिशय प्रेमदेखिल होते. जेथे प्रेमाचे आधिक्य असते तेथे प्रणाम आदि गौरव सूचक रितीरिवाजांचा आदर न होऊनसुद्धा मर्यादांचे उल्लंघनही होत नाही.

नंदबाबांनी अशा प्रकारे आदर सत्कार केल्यानंतर वसुदेवजींनी आसन ग्रहण केले आणि आपल्या दोन्ही पुत्रांच्या प्रति स्नेहासक्त होऊन याप्रमाणे वदले- "हे भ्रातः! इतका वेळपर्यंत अपत्यहीन राहिल्याने आपली संतानप्राप्तीची आशा जवळजवळ संपलीच होती. अशावेळी आपल्याकडे पुत्राचा जन्म होणे म्हणजे महासौभाग्याचा विषय आहे. भाग्यक्रमाने आज आपल्याला भेटून असे वाटले जणू माझा पुनर्जन्मच झालाय. कारण संसार चक्रात फिरतांना आपल्या प्रियजनांचे दर्शन अतिदुर्लभ असते. ज्याप्रकारे नदीच्या प्रवाहात वाहत जाणारे तृण, काष्ठ आदि अधिक काळापर्यंत एकाच स्थानी नाही राहू शकत त्याचप्रमाणे विभिन्न कर्मफलांनी आबद्ध बंधूगण या कालचक्रात अधिक काळापर्यंत एकत्र राहू शकत नाही."

अशा प्रकारे वसुदेवजी नंदबाबांच्या दर्शनाने आनंदित होत होत त्यांचे क्षेमकुशल विचारु लागले- "आजकाल आपण आपल्या स्वजनांसहित ज्याठिकाणी वास करित आहात, ते स्थान आपल्या गाई आणि पशुधनाकरिता हितकारी आहे का? तेथे कुठल्याही प्रकारचा रोग वगैरे तर नाही नाही ना? तेथे पाणी, गवत वगैरे भरपूर तर आहे ना?"

आपला पुत्र बलराम याच्या जन्माचा वृत्तांत ऐकण्याकरिता श्रीवसुदेवजी उत्कंठित होते. त्या उत्कंठेपोटी त्यांनी विचारले, "यशोदाजी तथा आपल्याद्वारा लालित माझा पुत्र आपली माता रोहिणीसहित कुशलपूर्वक तर आहे ना? परिवार आणि सुहृदांच्या प्रति धर्म, अर्थ, काम- या त्रिवर्गांचे संपादन पुरुषांकरिता शास्त्रांत निर्देशित आहेत. सुहृद जर दुःखी कष्टी असतील तर हे त्रिवर्ग सुखप्रद नसतात. आपल्या स्त्री-पुत्रापासून विरह तसेच पुत्र पालनाच्या

सुखापासून वंचित होणं म्हणजेच माझा गृहस्थधर्म विफल असल्याप्रमाणेच आहे. ”

श्रीवसुदेवजींची व्यथा योग्यप्रकारे जाणत असल्याने त्यांची सांत्वना करित श्रीनंदमहाराज उद्‌गारले- “हाय! कंसाने देवकीजींच्या गर्भातून उत्पन्न आपल्या बऱ्याचशा पुत्रांची हत्या केली आहे. त्यानंतर आपली एक कन्या वाचली होती. ती सुद्धा आकाशांत अंतर्धान पावली. मनुष्य निश्चितच अदृश्यात निष्ठ आहे. अदृष्ट कर्मफळांत जर पुत्रसुख नाही तर त्या मनुष्याला पुत्र प्राप्ति होऊ शकत नाही. कर्मफळात पुत्र सुख असेल तर आता पुत्रापासून वियोग असला तरी भविष्यात पुनर्मिलन अवश्य होईल. जी व्यक्ती हे जाणते ती मोहाला बळी कधीच पडत नाही.” असे म्हणत नंदबाबांनी वसुदेवजींना थोडी सांत्वना दिली.

तेंव्हा श्रीवसुदेवजी म्हणाले- “तुम्ही आता कंसाचा करही भरला आहे आणि माझ्याशी देखिल तुमची भेट झाली आहे. आता आपले मथुरेत अधिक थांबणे उचित नाही कारण शत्रू कंसाद्‌वारे गोकुळात उत्पात घडवून आणण्याची आशंका दिसते. तेंव्हा आपण अतिशीघ्र गोकुळी प्रस्थान करावे.”

श्रीवसुदेवजींच्या वचनावर पूर्ण विश्वास ठेवित श्रीनंदजींनी त्यांची अनुमती घेतली आणि आपल्या सोबत आलेल्या गोपांना बरोबर घेऊन आपल्या बैलगाडीतून ते गोकुळी रवाना झाले. मनाने तर ते केंव्हाच गोकुळी पोहोचले देखिल होते. मार्गाने जातांना कुठल्याही अनिष्टाच्या चिंतेने भयभीत होऊन ते मनोमनी आपले इष्टदेव श्रीहरिंच्या शरणापन्न होत चिंतन करित होते.

इकडे कंसाने दिलेल्या आज्ञेनुसार जे दैत्य गाई, ब्राह्मण तथा नवजात बालकांच्या हत्येच्या अभियानी निघाले होते त्यांत भीषण स्वभाव असणारी बालघातिनी पूतना नामक एक राक्षसीणी होती. एका कंस आपल्या दिग्विजयी यात्रेकरता निघाला होता. त्याने अनेक पराक्रमी राक्षसांना परास्त करुन आपले साथीदार बनवून घेतले होते. त्यांत बकासूर नावाचा नावाच्या

एका महाबली दैत्यासोबत कंसाचे भीषण युद्ध झाले होते. युद्धात आपल्या भावाचा विजय व्हावा या अभिलाषेने बकासुराची बहिण पूतना देखिल युद्धाकरिता उद्यत झाली. कंस हसतच म्हणाला- "पूतने! तू एक स्त्री आहेस, तेंव्हा मी काही तुझ्याबरोबर युद्ध करणार नाही." मग कंसाने एक संधीचा प्रस्ताव ठेवला की आता बकासूर माझा भाऊ आणि तू माझी बहिण होऊन रहा. आपला भाऊ कंसाची सहाय्यता करण्याकरिता पूतना आकाशमार्गाने, नगर, गावे, गोठे इ. भ्रमण करित असे आणि दहा दिवसांखालील सर्व शिशुंची हत्या करुन त्यांचे मांस खाऊन त्यांचे रक्पानही करु लागली. पूतना शब्दाचा अर्थ आहे पूत + ना = पूतना, अर्थात पुत्ररहित किंवा जो पवित्र नाही तो, अपवित्र. तिचे डोके दाट जटांनी अच्छादित असल्यामुळे तिचे मुख भयंकर विकट वाटत असे. मोठमोठ्या सुळ्यांना भक्षण केलेल्या बालकांचे रक्मांस लगडले असल्याने तिचा चेहरा अत्यंत भयानक वाटत होता. तिच्या नेत्रांच्या भल्यामोठ्या खड्ड्यांच्यावर असणाऱ्या पापण्या म्हणजे जणू काही एकएक लांब फणीवाले सर्पच भासत होते. ज्यांना पाहून सर्वांचेच धैर्य च्यूत होत होते. तसेच तिच्या नासिका विवरातून बाहेर डोकावणारे मोठे मोठे केस भयंकर सर्पांप्रमाणे दिसत असत ज्यामुळे सारे ब्रह्मांडच भीतीने थरथर कापत असे. तिच्या दोन मोठमोठ्या स्तनांमधून दुधाच्या ऐवजी विष वाहत असे ज्याची विषमज्वाला असह्य शक्तिसम होती. तिचा प्रत्येक अवयव हा प्राणीमात्रांसाठी प्रतिकूलच होता. बालकांना तर ती गाजर-मुळ्याप्रमाणे चावून खात असे.

मनुष्य जिथे भगवंतांच्या पवित्र नामाचे संकीर्तन करतो तेथे आसुरी शक्तिंचा प्रभाव नसतो. जेथे भगवंताचे नाम-कीर्तन अथवा कथा श्रवणादी होत नाही तेथे आसुरी शक्ती आपला प्रभाव दाखवू लागतात. पूतनेने सुद्धा केवळ नास्तिक आणि आसुरी प्रवृत्ती असणाऱ्या व्यक्तिंच्या शिशुंचाच वध केला, श्रद्धावान किंवा भक्तांच्या शिशुंचा नाही.

अशा प्रकारे आकाशांत विचरण करता-करता ती नंदबाबांच्या गोकुळी आली. त्या नगरीचे रक्षण करणारे धनुर्धारी नारायणास्त्र आदी विद्येत पारंगत होते व ब्रजराजजींद्वारे रक्षित होते. त्यांच्या भीतीने

पूतनेने आपले दुष्ट रुप त्यामून, आपल्य आसुरी मायेद्वारे एक अति मनोहर रुप धारण केले. तिच्या केसांमध्ये मल्लिका पुष्प गुंफलेले होते. तिचे नितंब मोठे मोठे आणि स्तनांच्या भारामुळे जणू काही तिची कंबंर क्षीण झाली होती. तिने अत्यंत सुंदर वस्त्र धारण केले होते. तिच्या कानातल्या कुंडलांची अनोखी प्रभा तसेच चकाकणाऱ्या केसांनी आवृत्त मुखमंडल अपूर्व शोभा प्राप्त करित होते. आपल्या मनोहर हास्याने आणि कटाक्षांद्वारे तिने समस्त ब्रजवासींचे मन मोहून घेतले. तिला पाहून गोपी मनोमन विचार करु लागल्या, की असे वाटते जणू स्वतः वैकुंठातून लक्ष्मीजी आपल्या हातात लीलाकमळ घेऊन आपल्या पतिराजांच्या (ब्रजवासींचे आराध्य श्रीनारायण) दर्शनाभिलाषेने येथे आली आहे.

"अहो! काय रुप! काय अनुराग!" असा भाव ब्रजवासींच्या हृदयात जागृत झाला. तिने नंदभवनातील अंतःपुरात प्रवेशदेखिल केला. मात्र तिचे रुप आणि तिच्या भावभंगिमांनी मोहिक झालेल्या कुठल्याही ब्रजवासीने तिला अडविलेसुद्धा नाही. वास्तविक पाहता पूतनेने ब्रजवासींना मोहित करणे योगमायेच्या प्रेरणनेच संभव होऊ शकले. यद्यपि श्रीभगवंताची जगन्मोहिनी माया सिद्ध भक्तांनादेखिल मोहित करण्याचे साहस करु शकत नाही, तरी देखिल श्रीकृष्णलीलेच्या सिद्धीकरिता इंद्रजालिक मायेसमान असणाऱ्या पूतना-मायेने ब्रजवासींना मोहित केले, याला श्रीभगवंताचीच इच्छा समजावी लागेल.

इथे एक प्रश्न निर्माण होऊ शकतो की अनेकानेक सिद्ध पुरुष जन्मजन्मांतरापर्यंत कठोर साधन तपस्या करुनही ब्रजभूमीत प्रवेश करु शकत नाहित. येथे प्रवेश केवळ ब्रजवासियांच्या आनुगत्यात राहून भजन करणाऱ्यासच प्राप्त होतो. मग पूतनेसारखी राक्षसी ब्रजभूमित कशी प्रवेश मिळवू शकली? वास्तविक हे कार्य योगमायेद्वारेच होऊ शकले. नवकुमार शिशुंवर कुठलीही विपत्ती येऊ नये म्हणून सगळ्यांच ब्रजवासिंचे प्रेम अत्यंत प्रबळ झाले. याच प्रेमात प्रगाढता आणण्याकरिता योगमायेने पूतनेचा व्रजभूमित प्रवेश करविला.

नंदभवनातल्या अंतःपुरात प्रवेश केल्यानंतर पूतनेने शय्येवर पहुडलेल्या बालकरुपी श्रीकृष्णाला पाहिले. ज्याप्रमाणे राखेच्या ढिगाऱ्यात असणारा अंगार पतंगाला दिसू न शकल्याने त्याच्याजवळ जाताच तो जळून जातो, त्याचप्रमाणे आपली भगवत्ता झाकून ठेवित, लपवून ठेवित श्रीकृष्ण एका सामान्य नवजात बालकाप्रमाणे पहुडलेले होते आणि हे न जाणणारी पूतना आपल्या काळाच्या निकट जात होती. समस्त जीवांचे आत्मस्वरुप असलेल्या श्रीकृष्णाने त्या पूतनेला बालघातिनी रुपात पाहून आपले डोळे बंद करुन घेतले.

पूतनेला पाहून श्रीकृष्णाने आपले डोळे का बंद केले असतील यासंबंधी आपले आचार्यगण पाच कारणे सांगतात.

१. प्रथम कारण श्रीकृष्णाचे बाल माधुर्य आहे. शिशु अधिकांश वेळ झोपलेलेच असतात. आता जागे आहेत तर दुसऱ्याच क्षणी निद्रावश डोळेबंद करुन झोपी जातात, हा शिशुंचा स्वभाव असतो. आणि आपल्या आईजवळ असल्यावर ते हसतखेळत असते मात्र कुणी अपरिचित समोर आले की भयभीत होऊन जाते आणि आपले डोळे झाकून होते. श्रीकृष्ण आपल्या मातेला पाहून हसतखेळत होते पण अपिरिचित पूतनेला पाहताच भीतीने त्यांनी डोळे झाकून घेतले.
२. दुसरे कारण म्हणजे अमंगल अर्थात दुष्टाच्या दर्शनाची अनिच्छा. पूतना आपल्या हृदयात बालकांची हत्या करण्याची भावना घेऊन व्रजभूमित आली होती. श्रीभगवंतांच्या लीलाशक्तिची प्रभावामुळे ती दुसरीकडे कुठेही न जाता सर्वप्रथम नंदनंदन श्रीकृष्णाकडे आली. जो भक्ताचे अनिष्ट करतो अथवा अनिष्ट करण्याचा संकल्प करतो तो अमंगल स्वरुप दुष्टच आहे. दुष्ट पूतनेने दुष्ट संकल्प केला होता, म्हणून ती अमंगल स्वरुप दुष्टच होती. दुष्ट पूतनेचा संकल्पही दुष्ट असल्याकारणाने भगवंताने तिच्या मुखाचे दर्शन घेतले नाही.
३. श्रीभगवंतांसमोर कपटता थांबू शकत नाही. पूतना येथे छद्मवेशात आली होती. जर श्रीकृष्णाने तिच्याकडे पाहिले असते तर तिचे वास्तविक रुप

तेथे प्रकट झाले असते आणि यशोदामाई घाबरली असती. म्हणून श्रीकृष्णाने पूतनेच्या दिशेने न पाहता आपले नेत्र बंद करून घेतले.

४. पूतनेने नंदभवनात मातृ-भावनेचा प्रकाश केला होता म्हणून मातृवेशधारिणी एका स्त्रिचा वध कसा करायचा या कारणाने लज्जित होऊन भगवंताने आपले डोळे बंद केले.

५. पूतनेची मरणकालीन यंत्रणा आपल्या डोळ्यांनी पाहण्याची अनिच्छा. यद्यपि भगवान स्वयं दंडदाता आहेत. परंतु त्याचबरोबर ते अत्यंत स्नेहमयी सुद्धा आहेत. अन्याय करणाऱ्याला शासन करण्याच्या उद्देशाने त्याचा वध त निश्चितच करतात. परंतु त्याच्या मरणकालीन कुकृत्यांना ते पाहू शकत नाहित. म्हणून श्रीकृष्णांनी आपले डोळे बंद केले. पूतना कपट वात्सल्य भाव प्रकाशित करित यशोदा आणि रोहिणी देवींना म्हणाली- "तुमचे हृदय अतिकठोरच दिसते. अशा सुंदर सुकुमार पुत्राला शैय्येवर झोपवून त्याच्याकडे मनापासून विशेष लक्ष न देता अशाच गप्प बसून राहिल्यात? आपल्या बाळाला, हृदयाशी कवटाळलेले नाही. बघा! प्राण तर हृदयातच ठेवावा ना, मग प्राणांहूनही अतिप्रिय अशा पुत्राविषयी तर काय बोलावे? या बालकाला पाहून तर माझे नेत्र आनंदाने भरुन गेलेत आणि माझे दोन्ही स्तन जे सगळ्यांकरिता विस्तारक आहेत, तसेच नित्य अमृताची बरसात करणारे आहेत. ते अमृततुल्य दूध पिण्याने हे बालक निश्चितच सिद्ध देह प्राप्त करेल आणि मी याची सर्वसुखविधान करणारी दाई बनेन." असे म्हणून पूतनेने श्रीभगवंताला आपल्या मांडीवर घेतले आणि आपले स्तनपान करवू लागली. ज्याप्रकारे कुणी अज्ञानी व्यक्ती मूर्खतावश झोपलेल्या सापाला दोरखंड समजून उचलून जवळ घेते, त्याचप्रमाणे पूतनेने भगवंताला एक साधारण बालक समजून आपल्या मांडीवर घेतले. पूतनेचे अतिमनोहर बाह्यरुप तसेच मातृवत वात्सल्य पाहून यशोदा आणि रोहिणी देवी मनोमन विचार करु लागल्या की आपल्या पुत्राच्या मांगल्याकरिता ही अंबिका देवी किंवा इंद्राणी प्रत्यक्ष इथे आली नसेल

ना? किंवा मग साक्षात लक्ष्मीदेवी वात्सल्य भावनेने आपल्या पुत्राला स्वतःचे स्तनपान करवित आहे. असा विचार करता करता त्या फक्त एकटक पहात राहिल्या आणि पूतना श्रीकृष्णाला आपल्या मांडीवर घेतांना अडवू शकल्या नाहित.

श्रीकृष्णाला आपल्या मांडीवर घेऊन पूतनेने कालकूट-लेपित आपले स्तन कृष्णाचया मुखात दिले. माझ्या ब्रजबालकांना ही क्रूर राक्षसी मारण्याच्या उद्देशाने आली आहे. म्हणून भगवान श्रीकृष्ण क्रोधित होऊन दोन्ही हातांनी बलपूर्वक तिचे स्तन पकडून तिच्या दुधाबरोबर तिचे प्राणही प्राशन करु लागले. श्रीकृष्णाने आपल्या बालसुलभ स्वभावाने ही सूचना दिली की स्तनपानच नवजात शिशुची जीविका किंवा स्वभाव आहे. “अगं पूतने! हे स्तन तु माझ्या मुख्यात दिलेस आणि मी त्याचे पान केले त्यानंतर जर तू मेलीस तरी त्यात माझा काय दोष आहे?”

भगवान श्रीकृष्ण स्तनपान करित असतांना पूतना राक्षसीच्या स्तनांमध्ये असह्य वेदना होऊ लागल्या आणि ती मोठमोठ्याने ओरडू लागली, “मला सोड, सोड मला, खूप दूध प्यायलास आता तरी मला सोड.” परंतु दहा हजार हत्तींचे बळ असणारी पूतना खूप प्रयत्न करुनसुद्धा छोटे छोटे नाजूक हस्तकमल असणाऱ्या बाळकृष्णाला आपल्या स्तनांपासून दूर करु शकली नाही. तिचा समस्त देह घामाने भिजून चिंब झाला, वेदनेने डोळे विस्फारले आणि इथे तिथे हातपाय आपटित तो जोरजोरात रुदन करु लागली. तिच्या मुखातून असा भयंकर आवाज निघू लागला, ज्यामुळे पर्वतांसहित पृथ्वी तथा ग्रहांसहित आकाशही हलू लागले. त्या भयंकर आवाजाचा प्रतिध्वनी सगळ्या दिशांतून झाल्याने मानवगण वज्रपाताच्या भीतीने जमिनीवर पडले. स्तनांमध्ये अतिभीषण वेदना होत असल्याकारणाने तिचे मुख उघडले, तिचे केस विस्कटले आणि आपले हातपाय आपटीत स्वतःच्या प्राणांच्या

रक्षणाकरिता पूतना आपल्या वक्षःस्थळावर श्रीकृष्णाला लटकवित नंदभवनाबाहेर येऊन आकाशमार्गाने भ्राता कंस याकडे जाऊ लागली.

बाळकृष्णाला पूतनेसोबत जातांना पाहून दोन्ही मातांचे पंचप्राण मूर्चित झाले. अन्यथा अशा असहनीय वेदनेला त्या कदापिही सहन करु शकल्या नसत्या.

पूतना विचार करित होती की मी आपल्या समस्त शक्ति पणाला लावूनही काही करु शकले नाही. आता माझा भाऊ कंसच माझे रक्षण करु शकतो, दुसरा तरणोपाय नाही. आकाशमार्गाने उडतांना ती श्रीकृष्णाचा नाही तर कंसाचा विचार करित होती. परंतु श्रीकृष्ण मात्र विचार करित होते की तु माझ्याकडे मातेच्या वेशात आलीस तर मी तुला कसा सोडू शकेन?

पूतनेचे वास्तविक (घुबडासारखे) भयंकर रुप पुन्हा प्रकट झाले आणि आणि व्रजभूमिच्या बाहेर प्राणत्याग केल्यानंतर तिचे विशालकाय शरीर सहा कोसापर्यंत वृक्षांना चूर्ण-विचुर्ण करित पृथ्वीवर येऊन पडले. पूतनेने आपल्या जीवितकाळात अनेक प्राणयांचा वध तर केलाच होता, मरतांना सुद्धा अनेक जीवांचा तिने प्राणनाश केला. तिच्या प्रचंड शरीराच्या आघाताने विशाल महावन (व्रजभूमी) नगरीचे काहीच अनिष्ट होऊ शकले नाही. पडलेले आंबा आदिंचे वृक्ष कंसाच्याच बागेतले होते.

तिचे शरीर वास्तवात खूप विशाल आणि आश्चर्यकारक होते. जिथे तिचे हात पडले त्या नगरीचे नाव ‘हाथरस’ पडले, जिथे तिचे मस्तक पडले ते स्थान ‘मुरसान’ नावाने ओळखले जाऊ लागले. तिच्या मुख्यात टोकेरी असे तीक्ष्ण दात होते. नासिकांचे खड्डे पर्वताच्या गुहेप्रमाणे खोल होते. दोन्ही स्तन पर्वत शिखरांप्रमाणे विशाल होते. तिच्या जटा पसरलेल्या आणि तांब्याच्या रंगाप्रमाणे होत्या. डोळे खोल अंधाऱ्या विहीरींप्रमाणे होते, जांघा नदी तटासमान भीषण होत्या. तिचे हात आणि पाय पुलासमान होते आणि तिचे पोट सुकलेल्या, जलहीन जलाशयाप्रमाणे

होते. आधीच तिच्या भीषण आवाजाने गोप-गोपींने हृदय, कर्ण आणि मस्तक विदीर्ण झाले होते. त्यांतच तिचा तो भयंकर देह पाहून ते सगळे आणखीच घाबरले.

परंतु त्या मृतदेहाच्या वक्षःस्थळावर निर्भय बाळकृष्णाला खेळतांना पाहून ते सगळे अत्यंत हर्षित झाले. त्यांनी शीघ्रतापूर्वक त्या मृतदेहाजवळ जाऊन बाळकृष्णांला कडेवर घेतले. गोपी श्रीकृष्णाला घेऊन अतिव वेगाने नंदभवनी आल्या जिथे यशोदा आणि रोहिणी मूर्छित होऊन पडल्या होत्या. त्यांची मूर्छा इतकी गहन होती की गोपींद्वारे अनेक उपाय करुनही ती दूर झाली नाही. मग एका बुद्धिमती गोपीने बाळकृष्णालाच त्या मूर्छित मातांच्या मांडीवर ठेवले. पुत्र मांडीवर येताच पुत्र-लाभरुपी अमृतामुळे त्यांच्या प्राणांची रक्षा झाली, आणि त्यांची मूर्छा भंग होऊन त्या शुद्धीवर आल्या. चेतना आल्यानंतर, मृत्यूच्या मुखातून परत आलेल्या आपल्या बाळकृष्णाला डोळे भरुन पाहता पाहता पुन्हा आनंदजनित दुसऱ्या प्रकारच्या मुर्छेस प्राप्त झाल्या. वारंवार केलेल्या जलशिडकाव्याने ज्याप्रमाणे ग्रीष्मऋतुने संतप्त भूमी शीतल होऊन जाते, त्याच प्रमाणे वारंवार बाळकृष्णाचा स्पर्श होऊन मातांचे हृदय सुशीतल होत होते.

दोन्ही मातांनी वारंवार श्रीकृष्णाचे आलिंगन केले, पुन्हा पुन्हा त्याचे श्रीमुखचुंबन केले. मस्तक उराशी धरले आणि आनंदाश्रुंच्या प्रवाहाने ते अभिषिक्त केले. थोड्यावेळाने जेंव्हा त्यांचा मनोवेग थोडा शांत झाला. तेंव्हा त्यांना विश्वास झाला की त्यांचा पुत्र निःसंदेह कुशलपूर्वक परतलाय, तेंव्हा त्याच्या रक्षेकरिता एक काळी गाय तेथे आणविली गेली आणि रक्षामंत्रांचे वाचन करित करित तिची शेपटी बाळकृष्णावर फिरविली. त्यानंतर गोमूत्र आणि गोमयाने बालकाला स्नान घालण्यात आले. आणि मग शेणाने केशव, नारायण, माधव, आदि नाम उच्चारण करित ललाटादि अंगावर द्वादश तिलक रचना करित बालकाच्या रक्षेचा विधी करण्यात आला.

असे करुन बाळाच्या सुरक्षेविषयी थोडे आश्वस्त झाल्यावर गोपींनी आचमन केले. शास्त्रविधिंनुसार आधी आचमन करायचे त्यानंतर मंत्रांचा जप करावा, परंतु इतक्या मोठ्या संकटांचे निवारण झाल्यामुळे यशोदा आणि सगळ्या गोपी थोड्यावेळेकरिता विधी-विधान विसरुन गेल्या. गोपींनी आचमन करुन पुन्हा रक्षामंत्र म्हणायला सुरुवात केली- “अज तुझ्या चरणांची, मणिमान् जानूंची, यज्ञ जाघांची, अच्युत कटिची, हयग्रीव उदराची, केशव हृदयाची, ईश वक्षस्थळाची, सूर्य कंठाची, विष्णु भुजांची, उरुक्रम मुखमंडळाची, ईश्वर मस्तकाची चक्री समोरुन, गदाधरी श्रीहरी मागून, धनुर्धारी मधुरिपु तथा असिधारी कोनांमधून, उपेंद्र वरुन, गरुड वरुन तथा हलधर पुरुष चारी दिशांनी तुझी रक्षण करोत. हृषिकेश समस्त इंद्रियांची, नारायण प्राणांची, श्वेतद्वितधिपती चित्ताची तथा योगेश्वर तुझ्या मनाची रक्षा करोत. पृश्निगर्भ बुद्धी तथा परमेश्वर तुझ्या आत्म्याची रक्षा करोत. गोविंद खेळतांना, माधव झोपतांना, वैकुंठ चालतांना, श्रीपती बसतांना तसेच सर्वग्रह विनाशक यज्ञभुक् भोजन करता करता तुझी रक्षा करोत.”

डाकिनी, यातुधानी आणि कुष्मांड नामक शिशुविघ्नजनक ग्रहगण, भूत, प्रेत, पिशाच्य, यक्ष रक्ष, विनायक, कोटरा, रेवती, ज्योष्ठा, पूतना, मातृका, इ. देह, प्राण आणि इंद्रियांचे हिंसकगण, अपस्मार तसेच उन्माद रोग, स्वप्नात पाहिलेले सगळे उत्पात, वृद्धग्रह तथआ बालग्रह हे सगळे भगवान विष्णुंच्या मात्र नामग्रहणानेच भयभीत होऊन विनष्ट होऊन जातात.

यशोदा आणि तिच्या प्रियसख्या गोपींद्वारा अशाप्रकारे रक्षाक्रिया संपादन केल्यानंतर यशोदाजींने आपल्या पुत्राला, श्रीकृष्णाला स्तनपान करवून शय्येवर झोपविले.

तिकडे मथुरेहून व्रजधामी परतातांना नंद महाराजांनी पूतनेचा विशालकाय देह पाहिला आणि त्यांना अत्यंत आश्चर्य झाले. पूतनेच्या देहाचे निरीक्षण करतांना ते विचार करु लागले-

“देवराज इंद्राद्वारे छिन्नभिन्न केलेला कुठला पर्वत नभोमंडळातून इथे वृक्षांना भुईसपाट करित तर नाहीना येऊन पडला? किंवा मी योगिनीच्या मायेने चुकून दुसऱ्या देशात आलोय. थवा हे कोणाचेतरी इंद्रजाल तर नाही? तेंव्हा त्यांना वसुदेवजींचे व्रजांत उत्पात होण्याच्या आशंकेविषयीचे वचन आठवले, आणि मनोमन ते विचार करु लागले की वसुदेवजी निश्चितच तपस्वी आहेत. नाहीतर नक्कीच योगी असावेत जे उत्तम भविष्य जाणतात.”

तेव्हा उपनंदादिंच्या निर्देशानुसार निम्न जातीच्या व्रजवासिंनी त्या मृत राक्षसीचे विशाल शरीर कापून त्याचे अनेक खंड केले आणि त्या प्रत्येक खंडाकरिता एक एक चिता करुन त्यांना या आशंकेसह जाळून टाकले की ती पुन्हा जिवंत तर नाही होणार! श्रीकृष्णांनी त्या राक्षसीचे स्तनपान केले होते म्हणून तिचे सगळे पाप तत्क्षणात भस्म झाले. म्हणून जळणाऱ्या पूतनेच्या शरिराला अगुरुसारखा सुगंधित धूर येऊ लागला ज्याचा सुगंध मैलन् मैल लाबंपर्यंत पसरला.

पूतना लोकबालघ्नी राक्षसी रुधिराशना।
जिधांसयापि हरये स्तनं दत्त्वाऽऽप सद्गतिम्।।
किं पुनः श्रध्दया भक्तया कृष्णाय परमात्मने।
यच्छन् प्रियतमं किन्नुरक्तास्तन्मातरो यधा।।
(श्रीम भा. 10/6/35-36)

रक्तपान करणारी आणि बालघातिनी पूतना भगवान् श्रीकृष्णाला मारण्याच्या उद्देशान आली होती. परंतु भगवंतांच्या चरणस्पर्शाने तथा त्यांनी केलेल्या स्तनपानामुळे देहत्याग केल्यावर तीला भगवंतांच्या नित्य धाम गोलोकात धात्रीसमान सद्गति प्राप्त झाली.

वध करण्याच्या इच्छेने आलेल्या पूतनेने सदगति प्राप्त केली, तर जो उदासीन भावनेने अथवा त्याहीपेक्षा अधिक जो श्रद्धा-विश्वासपूर्वक आणि त्याहीपेक्षा जो श्रद्धा तथा भक्तिसहित प्रीतीपूर्वक भगवंतांचे भजन करतो त्याच्या गतीविषयी काय बोलावे?

विषाक्त स्तनापेक्षा त्या विषाअतिरिक्त वस्तू, त्याहीपेक्षा जर कोणी आपली प्रिय वस्तू प्रदान करित असल आणि कोणी आपली प्रियतर वस्तू प्रदान करित असेल अथवा कोणी आपली प्रियतम वस्तू प्रीतीपूर्वक प्रदान करित असेल तर ती व्यक्ती सद्‌गती प्राप्त करेल यात कुठलाच संशय असू शकत नाही, अर्थातच निःसंदेह प्राप्त करते.

भगवान् श्रीकृष्ण समस्त भक्तगणांच्या हृदयात वास करतात आणि शिव ब्रह्मादि लोकपूजनीय महाजन त्यांच्या चरणांची वंदना करतात. परंतु त्यांच्या चरणांची साक्षात् सेवा त्यांना प्राप्त होत नाही. असे चरण पूतनेकरिता वंदनीयही नव्हते आणि अवंदनीयही नव्हते. तिन तर प्राण त्यागतांना मात्र त्या चरणांना आपल्या वक्षस्थळावर धारण केले होते आणि याच कारणास्तव तिला सद्‌गती प्राप्त झाली. म्हणूनच उद्धवजी म्हणतात-

अहो बकी यं स्तनकालकूटं
जिघांसयापाययप्यासाध्वी।
लेभे गतिं धात्र्युचितां तत्तोऽन्यं
कं वा दयालूं शरणं व्रजेम।। (श्रीम भा. 3/2/23)

अहो काय आश्चर्य! बकासुराची दुष्ट बहिण पूतना हिने श्रीकृष्णाला मारण्याच्या हेतूने कालकूटलेपित स्तनाचे पान करविले आणि श्रीकृष्णाच्या नित्यधामी गोलोकात धात्रीसमान गती प्राप्त केली. म्हणूनच श्रीकृष्णा अतिरिक्त इतके दयाळू कोण असू शकते? अतः मी त्यांची शरण ग्रहण करतो.

पूतना पूर्वजन्मी महाराज बळींची कन्या रत्नमाला होती. भृगुवंशी ब्राह्मणांनी महाराजबळींना आपले तेज प्रदान करुन त्यांना अत्यंत बलशाली बनविले होते. ते ब्राह्मणांना मुक्तहस्ते दान दत होते आणि त्यांच्या सभेतून कुणीही रिकाम्या हातांनी परतू शकत नव्हते. त्यांचा वाढता प्रभाव पाहून बृहस्पतीजींनी ओळखले की यावेळी देवतांचा त्यांच्यासमोर युद्धात निभाव लागणे शक्य नाही, म्हणून मग त्यांनी

देवतांशी परामर्श करुन त्यांना मनमान्या रुपांना धारण करुन स्वर्ग सोडून अन्यत्र जाण्याचा सल्ला दिला. अशा प्रकारे राजा बळीने इंद्राच्या स्वर्गासहित तिन्ही लोकांवर अधिकार मिळविला. देवतांची माता आदिती हिने आपल्या पुत्रांना पुन्हा स्वर्गप्राप्ती व्हावी या करिता 'पयोव्रत' संपन्न करुन भगवंताला प्रसन्न केले. भगवंताने तिच्या वांछापूर्तीकरिता तिच्या पुत्र रुपात जन्म ग्रहण केला आणि तिच्या समक्ष शंख, चक्र, गदा तथा पद्म धारण करुन चतुर्भुज रुपात प्रकट झाले. आदितीने भगवंतांची स्तुती केली आणि भगवंताने एका बटुक ब्राह्मणाचा वेश धारण केला. त्यांनी हातात छत्र, दंड तथा कमंडलू धारण करुन राजा बळीच्या यज्ञशाळेत प्रवेश केला, तिथे भृगुवंशी ब्राह्मण बळीकरिता अश्वमेध यज्ञ करित होते. श्रीवामन भगवानांच्या तेजाने ऋत्विज, यजमान आणि सगळे सदस्य निःस्तेज झाले. सगळ्यांनी उठून त्यांचे स्वागत केले आणि त्यांना आसन देऊन त्यांचे चरण प्रक्षालन केले. राजा बळीने ते चरणामृत मोठ्या प्रेमभावनेने आपल्या मस्तकावर ठेविले. भगवंतांचे ते बालकरुप इतके मनोहर होते ज्याला पाहून रत्नमालेच्या हृदयात प्रबल वात्सल्यभाव जागृत झाला. ती मनोमन विचार करु लागली की किती बरे झाले असते जर हे बालक माझा पुत्र असता तर मी त्याला हृदयाशी घट्ट धरून स्तनपान करविले असते, ज्याने माझे जीवन सफल झाले असते.
राजा बळी म्हणाले- "हे ब्राह्मणकुमार! असे वाटते की आपणांस काहीतरी हवे आहे. आपल्याला कुठल्याही गोष्टीची गरज असेल तर निःसंकोच मागा-" भगवान श्रीवामनदेव म्हणाले- "दैव्येंद्र! आपण मनोवांछित वस्तू देणाऱ्यांत सर्वश्रेष्ठ आहात. म्हणूनच मी आपल्याकडून थोडीशी जमीन- केवळ आपल्या पायांनी तीन पावले भूमी मागतो आहे. आपण साऱ्या जगताचे स्वामी आहात, परंतु विद्वान पुरुषाने केवळ आपल्या आवश्यकतेनुसारच दान स्वीकारायला हवे." बळीने इच्छित दान देण्याचा संकल्प करताच भगवंताने आपले शरीर वृद्धिंगत करण्यास प्रारंभ केला. आणि ते इतके विशाल झाले की त्यांनी एका पावलात सारी पृथ्वी

मोजली, शरिराने समस्त आकाश व्यापले आणि दुसऱ्या पावलाने स्वर्गादि सर्व लोक मोजले.

जेंव्हा तिसऱ्या पावलाकरिता बळीच्या राज्याचे कुठलेही स्थान राहिले नाही तेंव्हा वचन पूर्ण न केल्या कारणाने श्रीवामनदेवांनी बळीला वरुणपाशबद्ध केले. पित्याला पशुसमान बांधलेले पाहताच रत्नमालेला अत्यंत क्रोध आला आणि ती मनोमन विचार करु लागली की, जर असा छल करणारा माझा पुत्र असता तर मी याला दुधाच्या जागी विष पाजले असते. सर्व प्राण्यांच्या हृदयात स्थित भगवंताने तिच्या या दोन्ही इच्छा जाणून त्या श्रीकृष्ण लीलेत अशा प्रकारे पूर्ण केल्या. परम करुणामय श्रीकृष्णाने तिच्या प्रतिकूल भावाचा तिरस्कार करुन अनुकूल भावच ग्रहण केला आणि तिला आपल्या नित्यधाम गोलोकात सदाकरिता धात्रीसमान गती प्रदान केली.

पूतना कपटतेची मूर्ती होती. बाहेरुन ममतेची मूर्ती आणि आतून मृत्यू. श्रीकृष्णाने सर्वप्रथम पूतनेचा वध केला. साधकाच्या हृदयात जोपर्यंत कपटता राहते तोपर्यंत भगवद्-भजनात प्रवेश होऊ शकत नाही. म्हणून भगवान आपल्या भक्ताच्या हृदयातील कपटतारुपी पूतनेचा नाश करतात.

‘पूत’ शब्दाचा एक अर्थ होतो ‘पवित्रता’ श्रीकृष्णाला मिळविण्याकरिता सर्वप्रथम हृदय पवित्र करायची गरज असते. जोपर्यंत हृदय ‘पूत’ नाही, ‘अपूत’ राहते तोपर्यंत भगवंतांची प्राप्ती होऊ शकत नाही.

## श्रीकृष्णलीला रहस्य

श्रीकृष्णलीला प्रकट आणि अप्रकट भेदात दोन प्रकारची असते, तत्वतः दोघांमध्ये काहीच अंतर नाही. अप्रकट लीला नित्यकाळ अप्रकट व्रजधामी सुरु असते. यांत प्रतिदिन अष्टकालीय लीलेच्या अनुसार लीला संपादित होत असतात. येथे श्रीकृष्ण नित्यिकिशोर वयीन विशिष्ट आहेत. श्रीकृष्ण

समस्त अवतारांचेही अवतारी आहेत, समस्त रसिक मंडळींचे शेखर स्वरुप आहेत. ते रसास्वादनाच्या आंकांक्षेने आपल्या परिकरवृंदाला पृथ्वीवर अवतरित करवून स्वयं अवतीर्ण होत असतात. ब्रजभूमीच परमलीला केंद्र आहे. पृथ्वीवर ही लीला प्रकटलीलेच्या नावाने ओळखली जाते. प्रकट ब्रजलीला नित्य आणि नैमित्तिक दोन प्रकारची असते, ब्रजची अष्टकालीय लीला येथेसुद्धा अविरत चालत राहते आणि हीच नित्य लीला आहे. जन्मलीला, असुरमारन तथा दूरप्रवास नैमित्तिक लीला आहेत. अप्रकट ब्रजधामी यशोदाजी हा अभिमान ठेवते की श्रीकृष्ण माझा गर्भजात पुत्र आहे, आणि जन्माचे नक्षत्र, तिथी आदिंनुसार जन्मोत्सव साजरा करते. नंदबाबा आणि अन्य सगळे व्रजवासीही हीच भावना ठेवतात, कंसाच्या वधाकरिता श्रीकृष्ण मथुरेला गेलेत आणि परत आलेत. तेथे गोचारण गमन हीच दूरप्रवास लीला आहे. याच सर्व लीला पृथ्वीवर स्थूलरुपात दिसून येतात, अप्रकट ब्रजधामी यांचा केवळ अभिमान मात्रच आहे.